cmyk

## संपादकीय

### दादा, तुम्हा शोधू कुठे...? अस्वस्थ महाराष्ट्राचा सवाल!

महाराष्ट्राचे अत्यंत लाडके राजकीय व्यक्तिमत्व अजितदादा पवार यांच्या निधनाने प्रचंड मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक संवेदनशील रांगडं आणि मराठी विशेषता ग्रामीण जनतेची नाळ बांधलेलं व्यक्तिमत्व हरपलं आहे. राजकीय असो व सामाजिक असो की कुठलेही क्षेत्र असो अजितदादा पवार यांचा सगळीकडे मुक्त संचार असायचा. अजित दादा पवार यांच्या भेटण्याने,


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७१ | गुरूवार दि.२९ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# अजित पवारांना शेतकरी नेत्यांकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण देश हळहळला आहे. शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी या दुर्घटनेची बातमी ऐकून मन सुन्न झाल्याचे सांगितले. तसेच शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आठवणीना उजाळा देत दुख व्यक्त केले. तर अखिल भारतीय किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहली.**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी म्हणाले की, अजितदादा हे दिलदार स्वभावाचे आणि उमद्या मनाचे नेते होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मी त्यांच्यावर अनेकदा टीका केली, पण त्यांनी कधीही ते वैयक्तिक पातळीवर घेतले नाही. एवढ्या टीकेनंतरही आमचा वैयक्तिक स्नेह कायम राहिला. महाराष्ट्राने एक अभ्यासू आणि जनसामान्यांच्या समस्यांशी जोडलेला नेता गमावला आहे. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणासह समाजकारणालाही मोठा धक्का बसला आहे, असे म्हणत शेट्टी यांनी अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. शेतकरी चळवळीचे नेते रविकांत तुपकर यांनीही भावुक प्रतिक्रिया व्यक्त केली. अजित पवार यांच्यासारखा सर्वगुणसंपन्न आणि स्पष्टवक्ता नेता महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा येणार नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ते नेहमी संवेदनशीलतेने निर्णय घेत. अनेकदा मोर्चे, आंदोलने, उपोषणे केल्यावर प्रथम दादांनीच आमची दखल घेतली, अशी आठवण त्यांनी सांगितले. तसेच सरकारच्या स्तरावर बैठका घेऊन शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. त्यांना आमच्यासारख्या संघर्षशील कार्यकर्त्यांचे खूप अप्रूप वाटायचे आणि विशेषतः माझ्यावर त्यांचे खूप प्रेम होते. राष्ट्रवादी काँग्रेसच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांना, विशेषतः शेतकरी चळवळीला याचा प्रचंड मोठा फटका बसला आहे. तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो, असे तुपकर यांनी म्हटले. अखिल भारतीय किसान सभेचे डॉ. अजित नवले यांनीही शोक व्यक्त केला. यावेळी ते म्हणाले, अजित पवार यांना श्रमिक जनता आणि शेतकऱ्यांबद्दल खूप सहानुभूती होती. अशा प्रकारे त्यांचे अकाली निधन झाले हे महाराष्ट्रासाठी अत्यंत क्लेशकारक आहे. पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहत आहे.

### राज्यभर तीन दिवसांचा दुखवटा घोषित

अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रभर शोककळा पसरली असून दि. २८ जानेवारी रोजी राज्यात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली. तसेच अधिकृतरीत्या राज्यभर तीन दिवसांचा दुखवटा घोषित करण्यात आला आहे. प्रशासनाकडून शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

### अंत्ययात्रेला पंतप्रधान मोदी राहणार उपस्थित

अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरूवारी विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार होणार आहेत. अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राज्यातील मंत्रिमंडळातील नेते उपस्थित राहणार आहेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मोदी यांनी शरद पवार यांना फोन करून सांत्वन केले. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह देशातील नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. राज्यभरातूनर कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणात बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बारामतीमध्ये पोहोचले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अंत्यसंस्कारासाठी बारामतीमध्ये पोहोचणार आहेत.

### साडे चार दशकांपासून राजकारणात

अजित पवार यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी आहे. मात्र, त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी अजित पवार मुंबईत आले, शिक्षण पूर्ण करून बारामतीला आले आणि तेथील सहकारी संस्थांमधून त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याला सुरुवात केली. अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते अखेरचा श्वास घेण्यापर्यंत ते राजकारणात सक्रिय राहिले. अजित पवार यांनी १९९५ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत होते.

### ते सर्वार्थाने ‘दादा’ होते – उद्धव ठाकरे

अजित पवार यांच्या निधनानंतर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील मी उमदा सहकारी गमावला. मी मुख्यमंत्री असताना अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. ते दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. महाराष्ट्रात ते ‘दादा’ म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने ‘दादा’ होते. दादांना माझ्यातर्फे, ‘ठाकरे’ व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी शोक व्यक्त केला.

### अजित पवारांच्या अपघाताचं गुढ उलगडणार!

बारामती विमान अपघातातील ब्लॅक बॉक्स सापडला असून, यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताचे नेमके कारण समोर येणार आहे. मुंबईहून बारामतीकडे जात असताना बुधवारी सकाळी सुमारे ८.४५ वाजता चार्टर्ड विमान बारामती विमानतळाजवळ लँडिंगच्या प्रयत्नात कोसळले. या अपघातात अजित पवार यांच्यासह विमानातील इतर चार जणांचाही जागीच मृत्यू झाला. अपघातग्रस्त विमानाचा फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर असलेला ब्लॅक बॉक्स सापडला असून, फॉरेन्सिक आणि तपास टीम त्याचे विश्लेषण करत आहे. यामुळे अपघाताचे नेमके कारण लवकरच स्पष्ट होईल.

## अजितदादा पवार यांच्या जाण्याने संपुर्ण महाराष्ट्रावर शोककळा

# दादा, पोरके करून गेलात !





## आज विद्या प्रतिष्ठाणवर अंत्यसंस्कार, लाखोंचा जनसमुदाय लोटला

**पुणे । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बुधवारी (दि.२८ जानेवारी) सकाळी विमान अपघातात निधन झाले. मुंबईवरून बारामती इथे येत असताना बारामती विमानतळावार लँडिंगच्यावेळीच विमानाला भीषण अपघात झाला. त्यात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. अजितदादा पवार यांच्या जाण्याने संपुर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, दादा, आम्हाला पोरके करून गेलात, अशा भावना संबंध महाराष्ट्रात उमटल्या आहेत. दरम्यान, त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी (दि.२९ जानेवारी) सकाळी ११ वाजता अंत्यविधी पार पडणार आहे. बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील विद्या प्रतिष्ठान येथे हा अंत्यविधी पार पडणार आहे.**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सर्वात धडाडीचे नेते आणि प्रत्येक दिवसाची सुरुवात पहाटे करून अवघ्या महाराष्ट्राला आदर्श घालून देणारे महाराष्ट्राचे दादा व्यक्तिमत्व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे बुधवारी (२८ जानेवारी) सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झाले. अजित पवार ६६ वर्षांचे होते. अजित पवार मुंबईहून बारामतीला एका खासगी विमानाने प्रवास करत होते. हे विमान – नोंदणी क्रमांक असलेले बॉम्बार्डियर लिअरजेट ४५ मॉडेलचे होते. अजित पवार यांच्यासह त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव, फ्लाईट असिस्टंट पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणिकॅप्टन शांभवी पाठक अपघातात मृत्यूमुखी पडले. प्रशासनावर पकड असलेला धुरंदर नेता, आपल्याला जे पटले नाही ते बेधकडपणे बोलणारे दादा, कार्यकर्त्यांना जागेवर सुनावणारे दादा, राजकीय विरोधकांनाही त्याच भाषेत सुनावणारे दादा अशा एक नव्हे तर अनेक आठवणी महाराष्ट्राच्या राजकारणात दादांच्या व्यक्तिमत्वाने कोरल्या गेल्या आहेत. म्हणूनच दादा पोरके करून गेलात, अशा बोलक्या भावना अवघ्या महाराष्टात उमटल्या आहेत. ही दुःखद घटना समजताच बुधवार सकाळपासूनच राज्यासह देशभरातून मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते आणि नेतेमंडळी अंत्यदर्शनासाठी उपस्थित राहण्यास सुरूवात झाली आहे.

### महाराष्ट्राच्या लाडक्या दादांना आज अखेरचा निरोप

**अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरूवारी त्यांच्या कर्मभूमीत अर्थात बारामती येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अंत्यसंस्कारावेळी त्यांना गार्ड ऑफ ऑनर देऊन मानवंदना दिली जाणार आहे. पवार कुंटुंबानी त्यांच्या कार्यकर्त्यांना अजित पवार यांच्या अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठान मैदानावर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.**

### “ अजित, तुझ्या निर्णयक्षमतेला महाराष्ट्र मुकला – शरद पवार



हा अपघाती मृत्यू महाराष्ट्राला प्रचंड असा धक्का आहे. एक कर्तृत्ववान निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र मुकला. जे काही नुकसान झाले ते भरुन निघणारे नाही. पण सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात. कातरलेल्या आवाजात, डोळ्यातील पाणी डोळ्यातच साठवत शरद पवारांनी महाराष्ट्रासाठी ही प्रतिक्रिया दिली. तसेच, हा केवळ अपघात आहे, याच्यात राजकारण नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### “ जमिनीशी जोडलेले नेतृत्व होते – पंतप्रधान मोदी



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात अजित पवार यांच्या संदर्भातील आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान म्हणाले, अजित पवार हे जमिनीशी जोडलेले नेतृत्व होते. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणारे कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जायचे. त्यांची प्रशासकीय कामांची जाण आणि गरिबांच्या कल्याणाची तळमळ उल्लेखनीय होती. त्यांचे निधन धक्कादायक आहे.

### उद्ध्वस्त... सुप्रिया सुळे



अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याचे वृत्त मिळाल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी व्हॉट्सअॅप स्टेटसद्वारे उद्ध्वस्त.. अशी भावना व्यक्त केली आहे. त्यांनी एका शब्दामध्ये पवार कुटुंबीयांवर कोसळलेला दुःखाचा डोंगर स्पष्ट केला आहे. २०२३ मध्ये अजित पवार यांनी शरद पवारांपासून फारकत घेतली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. राजकीय मतभेद असूनही सुप्रिया सुळे यांनी नेहमीच अजित पवार हे माझे मोठे भाऊ असल्याचे सांगत वैयक्तिक संबंध जपले होते. राजकारण आणि नाती यांची गल्लत होऊ नये. आमची लढाई ही वैचारिक आहे, वैयक्तिक नाही, असे सुळे यांनी वेळोवेळी स्पष्ट केले होते.

### दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला – देवेंद्र फडणवीस



**अजित पवार महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, महाराष्ट्रातील प्रश्नांची जाण असलेला नेता होता. त्यांच्याबद्दल जनसमान्यांमध्ये प्रचंड मोठी आस्था होती. अजितदादा अतिशय संवेदनशील नेतृत्व होतं. सर्व परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारं व्यक्तीमत्त्व होतं. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस हा अत्यंत कठिण दिवस आहे'' अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांच्या निधनानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या .''कारण अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. आणि ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासात अतिशय महत्त्वपूर्ण योगदान ते देत होते, त्यावेळी त्यांचं जाणं धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. माझ्यासाठी वैयक्तिक दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला आहे'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

### “ सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीत चौकशी करा – खरगे, ममता बॅनर्जी

अजित पवारांच्या विमान अपघातानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी चौकशीची मागणी केली आहे. ममता म्हणाल्या, कोणीही सुरक्षित नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली योग्य चौकशी झाली पाहिजे. हे विनाकारण भीती पसरवणारे आहे की कट आहे, हे काळच सांगेल. मला इतर एजन्सींवर विश्वास नाही. त्या पूर्णपणे तडजोड केलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास झाला पाहिजे, असे ममता म्हणाल्या. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपघाताची चौकशी होणार असल्याचे म्हटले असले, तरी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिलेला नाही.

### “ महाराष्ट्राची अपरिमित हानी – राष्ट्रपती आणि लोकसभेकडून भावपूर्ण श्रद्धांजली

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाबद्दल बुधवारी देशाच्या राजकीय वर्तुळातून तीव्र शोक व्यक्त करण्यात आला. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पवार यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली वाहिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, बारामती येथील विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याचे वृत्त अत्यंत क्लेशदायक आहे. त्यांचे अकाली जाणे हे राज्याच्या विकासासाठी नुकसानकारक आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत, विशेषतः सहकारी क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक आहे.

cmyk

अग्रलेख

# दादा, तुम्हा शोधू कुठे...? अस्वस्थ महाराष्ट्राचा सवाल !

महाराष्ट्राचे अत्यंत लाडके राजकीय व्यक्तिमत्व अजितदादा पवार यांच्या निधनाने प्रचंड मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक संवेदनशील रांगडं आणि मराठी विशेषता ग्रामीण जनतेची नाळ बांधलेलं व्यक्तिमत्व हरपलं आहे. राजकीय असो व सामाजिक असो की कुठलेही क्षेत्र असो अजितदादा पवार यांचा सगळीकडे मुक्त संचार असायचा. अजित दादा पवार यांच्या भेटण्याने, नुसत्या त्यांच्या बोलण्याने, पाठीवर हात ठेवल्याने आणि त्यांच्या नजरेस नजर भिडविल्याने कार्यकर्त्यांना हत्तीचे बळ यायचे. महाराष्ट्रातील सगळ्याच प्रश्नावर अत्यंत दिलखुलास बोलणाऱ्या आणि तेवढ्याच मिश्किल असणाऱ्या या नेत्याचा दुर्दैवीरित्या अपघातात मृत्यू झाल्याने, अवघा महाराष्ट्र हळहळत आहे. दादांकडून यापुढेही प्रचंड मोठ्या कामाची अपेक्षा होती मात्र त्यांनी अकाली एक्झिट घेतल्याने, दादा आम्ही तुम्हाला आता कुठे शोधायचे ? असा अत्यंत भावनिक आणि काळजाला भिडणारा प्रश्न राज्यातील सर्वच पक्षाचे दिग्गज नेते आणि कार्यकर्ते उपस्थित करीत आहेत.

अजित दादा पवार यांचा सगळीकडे मुक्त संचार असायचा. राजकारणात तर ते माहीर होतेच मात्र समाजकारण, राज्यातील विविध समस्या, महिला धोरण आणि आर्थिक बाबतीत ते राज्यामध्ये सातत्याने कार्यमग्न असायचे. त्यांच्या जाण्याने राज्याच्या सर्वच क्षेत्रामध्ये प्रचंड मोठी पोकळी निर्माण झाली आहे जी कधीच भरून येणार नाही. कारण अजितदादा हे संवेदनशील व्यक्तिमत्व होते. जे पटले ते ताबडतोब बोलायचे, मागे काहीच ठेवायचे नाही असा त्यांचा व्यवहार होता. त्यांच्या फटकळ आणि तोंडावर बोलण्यामुळे अनेकजण त्यांच्यापासून दुरावले गेले मात्र जेव्हा दादांची भूमिका त्यांच्या लक्षात आली तेव्हा ते पुन्हा दादाकडे गेले असा इतिहास आहे. त्यामुळे या संपूर्ण महाराष्ट्राची अपरिमीत हानी अजित दादा पवार यांच्या अकाली जाण्याने झाली आहे. कार्यकर्ते कसे सांभाळायचे, त्यांना कोठे रोखायचे, कोणाला किती वर न्यायचे अन कोणाला किती खाली आणायचे आणि त्यांना कशा पद्धतीने हाताळायचे याची हातोटी अजितदादा पवार यांच्यासारखी इतर कोणालाच नव्हती.

महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक विचित्र शांतता आहे. ही शांतता स्थैर्याची नाही, तर धैर्य हरवल्याची आहे. आणि म्हणूनच एक प्रश्न अधिक बोचतोय दादा, आज तुम्ही कुठे आहात? कारण ज्या ठिकाणी प्रश्न असायचे, तिथे कधी काळी अजितदादा पवार उभे राहायचे. जिथे गोंधळ असायचा, तिथे त्यांचा खड्या आवाजातला हस्तक्षेप असायचा. आणि जिथे कार्यकर्ता गोंधळलेला असायचा, तिथे दादांचा एक शब्द त्याला उभं करायचा. आता थेट भिडून बोलणारं नेतृत्व कोठून आणणार. ? ग्रामीण महाराष्ट्राला समजून घेणारा, शेतकऱ्यांच्या वेदना कागदावर नव्हे तर जमिनीवरून ओळखणारा नेता म्हणजे अजितदादा. ते कधीच सजावटीच्या भाषणात अडकले नाहीत. त्यांना पीआर नव्हता, पण परखडपणा होता. त्यांच्याकडे गोंडस शब्द नव्हते, पण निर्णय होते. ते फटकळ होते, ते तोंडावर बोलायचे. यामुळे ते अनेकांना ते नकोसे वाटायचे, पण जेव्हा कोणतेही संकट यायचं, तेव्हा सगळे दादांकडेच पाहायचे. आज ते व्यक्तीमत्व अन् करारी बाणा हरपला आहे.

अजितदादांची खासियत अशी होती की, ते कार्यकर्त्याला ओळखायचे. कोण किती लायक आहे, कोण किती सहन करू शकतो, कोणाला कधी थोपवायचं आणि कोणाला कधी पुढे ढकलायचं ही कला दादांकडे जन्मजात होती. म्हणूनच कार्यकर्ता अस्वस्थ आहे, म्हणूनच महाराष्ट्रात स्मशान शांतता पसरली आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्र अधिक अस्वस्थ आहे.

# कामाचा माणूस गेला



बीड । विशाल साळुंके

**बुधवारी सकाळीच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित दादा पवार हे गेल्याचे कळलं, धक्काच बसला. अजित दादांचं अचानक जाणं हे मनाला चटका लावून जातं. महाराष्ट्राच्या हितासाठी सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत काम करणारा माणूस आपल्यातून निघून गेला ही बाब मनाला पटत नाही. मात्र नियतीने आपले काम केले. त्याला कोणाचाच विलाज नाही.**

महाराष्ट्राच्या राजकारणात वेळ पाळणारा मंत्री म्हणून अजित दादांची ख्याती आहे. सकाळी सहा वाजता ते एखाद्या कामाचे उद्घाटन करू शकतात. हे अधिकाऱ्यांनी माहित असायचे. दादांना उशीर झालेला चालत नव्हता. मंत्रालयातही ते बरोबर नऊ वाजता यायचे असे लोक सांगतात. दहा मिनिटे उशीर झाला तरी ते सर्वांची माफी मागायचे.

अजितदादांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील विकास कामांना त्यांनी गती दिली. ज्यांची कामाची पद्धत चांगली आहे त्यांनीच कामे करावीत असा त्यांचा आग्रह असायचा. बीड जिल्ह्यातील अनेक कामे त्यांनी आपल्या काळात मार्गी लावली. विमानतळाचा असो एमआयडीसीचा असो किंवा तारांगणाचा प्रश्न असो निर्णय फाटक्यात घ्यायचे. मागच्या चार दिवसांपूर्वीच बीड शहरासाठी त्यांनी साडेबारा कोटी रुपये दिले. रस्त्याची अवस्था पाहून दादा म्हणायचे 'अरे काय केलं इथल्या नेत्यांनी अशी कशी कामे झाली' आता ते जमणार नाही आता नियमानुसारच काम करावे लागेल. ज्यांना नियमानुसार कामे करायची नाहीत त्यांनी काम करूच नका अशी तंबी त्यांनी सुरुवातीला दिली होती. अजित दादा म्हणजे कार्यकर्त्यावर प्रेम करणारा माणूस. थेट ग्रामीण शैलीमध्ये संवाद साधणारा. प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करूनच बोलणारा आणि तेवढाच मिश्किल त्यामुळे कार्यकर्त्या बरोबर त्यांची पटकन नाळ जुळायची कार्यकर्त्यांनाही असाच नेता आवडतो. बीड जिल्ह्यात त्यांनी धुरा सांभाळल्यापासून अनेक चांगल्या गोष्टी घडल्या. त्यांनी कधी पक्षपात केला नाही. प्रत्येकाला विकास कामांमध्ये सहकार्य करण्याचा त्यांचा हातखंडा होता. आमदार विरोधात असला तरी त्याचे काम झाले पाहिजे कारण शेवटी ते जनतेचे काम आहे असे मानणारा नेता विमान अपघातात काळाने हिरावून नेला. काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्या पासून वेगळे झाल्यानंतर अजित दादा फार काळ टिकणार नाहीत असा लोकांचा समज होता. मात्र त्यांनी आपल्या कर्तृत्वावर आणि नेत्यांशी असलेल्या जवळीकी सोबतच कार्यकर्त्या बरोबर असलेल्या जवळीकीमुळे आपले वेगळे स्थान निर्माण केले. सरकारमध्ये काम करतानाही इतर नेत्यांची मने दुखावणार नाहीत. इतर पक्षातील आमदारांशी समन्वय रहावा याची त्यांनी काळजी घेतली. एक मंत्री म्हणून ज्या गोष्टी करणे आवश्यक होते त्या सर्व गोष्टी दादांना अवगत होत्या. अगदी तरुण वयापासूनच सहकार क्षेत्रात काम केल्याने सहकार क्षेत्रातील खडा न खडा माहिती त्यांना होती. याबरोबरच शेती व्यवसायही नावारूपाला यावा यासाठी शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल याचा विचार ते सातत्याने करायचे. ग्रामीण भागाबरोबरच शहरी विकासासाठी त्यांनी तेवढेच योगदान दिले. पुण्यामधील अनेक भागांमध्ये याचे चित्र दिसते. पुण्यातला पिंपरी चिंचवड हा भाग, येथील रहिवासी मूळचे ग्रामीण भागातले मात्र या ठिकाणीही त्यांनी आपला वेगळा ठसा निर्माण केला. बीडचा विकास बारामती सारखा होईल मात्र त्याला साथ हवी. तुम्ही सगळ्यांनी साथ दिली तर ते शक्य आहे असे दादा नेहमी म्हणायचे. 'तुम्ही साथ दिली तर बघा कसा विकास होतो ते दादा जे बोलतो तेच करतो 'असे जाहीर बोलायचे त्यांच्या सडेतोड वागण्याने आणि स्पष्टपणे बोलण्याने ते प्रसिद्ध होते. त्यामुळे मनात एक आणि ओठावर दुसरे असे कधी होत नव्हते. जे मनात असेल तेच बोलणार. काम होत असेल तर स्पष्टपणे सांगणार करून टाकतो. होणार नसेल तेही स्पष्टपणे सांगणार होणार नाही म्हणून. या त्यांच्या स्वभावामुळे अनेक कार्यकर्ते त्यांच्या जवळ आले. महाराष्ट्रामध्ये अजित दादांच्या कामाची वेगळी ओळख निर्माण झाली. वेळ पाळणारा नेता म्हणून तर त्यांची ओळख आहेच याशिवाय हाती घेतलेले काम पूर्ण करणारा नेता म्हणूनही त्यांची ओळख होती. मंत्रालयातील प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देत कुठले काम झाले, कुठले झाले नाही यावर लक्ष ठेवत.

योगायोगाने मला बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात गावाकडील बंधाऱ्याच्या कामासाठी भेटण्याचा योग आला. यावेळी आमदार.संदिप क्षीरसागर यांच्यासह परिसरातील २०-२५ शेतकरी सोबत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद झाल्यानंतर आम्ही कार्यालयाच्या दारातच भेटलो. त्यावेळी त्यांनी हा विषय समजून घेतला आणि तुम्ही प्रशासकीय काम करा कुठे आडले तर मला सांगा मी करतो. तुमचे काम होऊन जाईल. शेवटी एवढ्या शेतकऱ्याचा फायदा होणार असेल तर हे काम केलेच पाहिजे असे स्पष्टपणे दादांनी सांगितले. पुढच्या आठवड्यात या कामासाठी पुन्हा एकदा दादांकडे जायचा योग होता. मात्र नियतीला ते मान्य नव्हते. बीडच्या विकास कामाची आखणी त्यांनी केली होती. त्याची ब्ल्यू प्रिंट त्यांच्या डोक्यात होती. मात्र आता दादाच नाहीत तर ही कामे होणार कशी? असा प्रश्न आहे .शेवटी काम करणाऱ्या व्यक्तीकडेच माणूस आशेने पाहतो. त्यामुळे दादांच्या जाण्याने बारामतीचे तर नुकसान झालेच झाले. परंतु बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले. पूर्वीच्या काळी मराठवाड्याचे माजी गृहमंत्री गोपीनाथराव मुंडे, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या जाण्यामुळे नुकसान झालेलेच आहे. याबरोबर संपूर्ण महाराष्ट्राचे नुकसान आर.आर.आबांच्या जाण्यामुळे झाले. ही माणसं राजकारणात असणे गरजेचे होते. समाजाच्या शेवटच्या माणसा बरोबर यांची नाळ जुळलेली होती. मात्र नियतीला ते मान्य नव्हते. वेळेच्या अगोदरच काळाने घाला घातला. आणि मराठवाड्याचा विकास ठप्प झाला. अजित दादा बीडला आल्यानंतर पुन्हा अशा पल्लवी झाल्या होत्या. मात्र नियतीला तेही मान्य नव्हते. शेवटी नियतीने दादांना हिरावून घेतले. जी गोष्ट आपल्या हातात नाही त्याबद्दल आपण काय बोलणार. माणूस हा निःशब्द होतो. अशी परिस्थिती दादांच्या जाण्याने झाली.

## गरजू महिलांनी प्रस्ताव दाखल करून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा-हस्तीमल बंब



जालना । प्रतिनिधी

शासनाची गरजुं होतकरु, कष्टकरी महिलांसाठी विशेष करून ग्रामीण भागासाठी लहान - मोठे उद्योग, गृह उद्योग करिता नाम मात्र व्याजाने कर्ज, तसेच अनुदान सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहे. नुकतेच जिल्ह्यातील ५० गांव शाखांचा संपर्क दौरा करून भेटी देण्यात आली आहे. प्रत्येक गावात व्यापारी संघटनेत महिला आघाडीचा गठन करण्यात आलेला आहे. गरजुं महिलांनी उद्योग, गृह उद्योगसाठी जिला उद्योग केन्द्र, जालना कार्यालयात आपले प्रस्ताव दाखल करून विविध शासकिय योजनांचा लाभ घ्यावा, असे उद्गार जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी काढले. व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्या महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांची बैठक श्री बंब यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून शासना तर्फे महाराष्ट्र बँकचे मुख्य प्रबंधक तथा अग्रणी जिल्हा प्रबंधक मंगेश केदार होते. जिल्हा महिला अध्यक्षा सौ. प्रिया जोशी यांनी बैठकीचे उद्देश्य सांगुन सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत केले. पुढे बोलताना बंब म्हणाले व्यापारी महासंघात जिल्ह्यात सर्व तालुक्यात ग्रामीण भागात उद्योग व्यवसायात इच्छुक व कार्यरत महिलांना एकजुट संघटीत करुन जवळपास ५० गावात महिलांची शाखा उघडण्यात आली आहे. व्यापारी संघटनेत महिलांना समान आरक्षण देणारा राज्यात एकमेव आपला जिला आहे. पुरुष मंडळीत अनेक लोक व्यसनाधीन होत चालले आहे. बिडी,सिगारेट,तंबाकु-गुटखा व दारु मुळे कुटुंब उध्वस्त होत आहे. त्यामुळे परिवारातील महिला पिठ गिरणी, पापड तैयार करून विकणे, शिवण काम, लहान-सहान गोळी बिस्कीट, किराणा व्यवसाय करून घरचे उदर निर्वाह करतात. या महिलांना शासनाचे योजना अंतर्गत कर्ज अनुदान मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यात गावो-गावी महिला गृह उद्योग उभारु असे बंब म्हणाले. महाराष्ट्र बँकेचे कर्ज वितरण विभागाचे मुख्य प्रबंधक तथा अग्रणी जिल्हा प्रबंधक मंगेश केदार मार्गदर्शन करताना शासनाची जिल्हा उद्योग केन्द्रा मार्फत गरजुं महिलांसाठी विशेष करून ग्रामीण भागासाठी अनेक योजना आहे. या योजनाचे कर्ज वितरण आमच्या बँका मार्फत देण्यात येते. व अनुदानासाठी लागणारे कागद पत्र व त्या बद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. व्यापारी संघटना महिलांसाठी करीत असलेले कामाचे कौतुक केले. कर्ज व अनुदानासाठी सर्व परि सहकार्य करु असे मंगेश केदार म्हणाले. सौ. आनंदी अय्यर, सुखदेव बजाज, राम मोहिते यांनी विचार मांडले. बैठकीत जिल्हा ग्राम उद्योग व बँका तर्फे कर्ज वाटप चे माहिती पत्रक देण्यात आले. मिटींग चे सुत्र संचालन प्रमोद जोशी यांनी केले तर आभार ॲड. अय्यर यांनी मांडले. बैठकीत कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## माजलगावचे प्रभारी राहूल सुर्यतळ यांची उचलबांगडी

माजलगाव । प्रतिनिधी

**येथील शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांची पोलीस अधिक्षकांनी लाचप्रकरणाचा ठपका ठेवून उचलबांगडी केल्याची माहिती समोर येत आहे.वाळूच्या प्रकरणात २० हजारांची लाच घेताना एका पोलीस कर्मचारी आणि खाजगी इसमाला रंगेहाथ पकडल्यानंतर पोलीस अधिक्षकांनी तात्काळ कारवाई करत प्रभारी अधिकाऱ्याला नियंत्रण कक्षात बदली करत दणका दिला आहे.**



बीड जिल्ह्यात वाळूचा प्रश्न ज्वलंत आहे.वाळूमुळेच अनेक अधिकाऱ्यांवर लाचलूचपत प्रतिबंधक पथकाने कारवाया केल्या आहेत. माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या ठाण्यातील कर्मचारी अमोल कदम याने वाळूच्या प्रकरणात २० हजाराच्या लाचेची मागणी केली होती. यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने लाच घेताना कदम सह एका खाजगी व्यक्तीला रंगेहात ताब्यात घेतले. दरम्यान या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाल्यानंतर पोलीस अधिक्षकांनी तडकाफडकी प्रभारी अधिकारी असलेल्या राहुल सुर्यतळ यांची नियंत्रण कक्षात बदली करून त्या ठिकाणी होम डिवायएसपी असलेल्या उमाशंकर कस्तुरे यांच्याकडे माजलगाव ठाण्याची सूत्रे सोपावली आहेत.तर नियंत्रण कक्षातून गात यांची बदली करत त्यांच्याकडे आता होम डीवायएसीपीचा पदभार देण्यात आला.

## पाटोदा-मांजरसुंबा महामार्गावर अपघातांची साखळी कायम

### जाधववस्ती जवळ ट्रक-दुचाकीचा भीषण अपघात; संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू



बीड । प्रतिनिधी

**अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंबा ते पाटोदा महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून आज दि.२८ बुधवार रोजी सायंकाळी सव्वा ७ वाजता जाधववस्ती परिसरात ट्रक व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.**

या अपघातात संतोष मधुकर कागदे वय ४२ वर्षे (रा. मोरगाव, ता. व जि. बीड) यांचा मृत्यू झाला. ते दुचाकीवरून प्रवास करत असताना हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार ट्रक क्रमांक एम एच १२ एच डी १५१४ आणि दुचाकी क्रमांक एम एच १२ ए एल ८५६१ यांच्यात जोरदार धडक झाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार धडक अत्यंत भीषण होती. अपघातात संतोष कागदे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस प्रशासनास कळविण्यात आले. त्यानंतर लिंबागणेश पोलीस चौकीचे पोह. मन्सूर शेख, पोशि. बाबासाहेब खाडे व पोशि. अब्दुल सय्यद हे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले पोलीस व रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी बीड जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. दरम्यान, या महामार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने या मार्गावर वाहतूक सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

## जिवाचीवाडी येथे आंबा बागेवर शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

### गटशेतीचे प्रणेते डॉ. बी. एम. कापसे यांचे मार्गदर्शन; शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग



केज । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे केज येथील जय हनुमान ॲग्रो एजन्सीच्या पुढाकाराने आंबा बाग यावर शेतकरी मेळावा व डॉ. बी एम कापसे यांचे मार्गदर्शन यासाठी शेतकरी मेळावा (दि.२१जाने.) आयोजित करण्यात आला होता.**

बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात आंबा फळबागाचे वाढते क्षेत्रफळ हे शेतकऱ्यांसाठी आनंदाची आणि आर्थिक विकासाची नांदी ठरू शकते. कारण आंबा या फळाला वाढती मागणी हे या मागचे मुख्य कारण असून यावर्षी तर आंबा या झाडाला भरपूर प्रमाणात मोहर लागलेला आहे. परंतु त्याचे योग्य नियोजन होत नसल्याने हा मोहर गळून पडतो आणि अनेक रोगांनी आंबा चा मोहर नष्ट होऊन जातो व शेतकऱ्यांच्या हातात काहीच लागत नाही हे जय हनुमान एजन्सीस च्या लक्षात आले आणि त्यांनी आंबा बाग तज्ञ डॉ. बी.एम. कापसे यांचे मार्गदर्शन जिवाचीवाडी येथे उपलब्ध करून दिले. अंबा लागवाडीसाठी खडकाळ मुरमाड जमिन योग्य आहे. अंबा बाग लागवड क्षेत्रातील जमिनीची मशागत साधारण मे महिन्यात करून घ्यावी आणि आंब्याच्या रोपाची लागवड पाऊस पडल्यानंतर करावी. लागवड पूर्वी बेडवर शेणखत तसेच चांगल्या प्रतीच्या बुरशीनाशक याचा वापर करावा. पुर्व पश्चिम दोन झाडातील तील अंतर १५ फुट , दक्षिण उत्तर दोन झाडातील तील अंतर पाच फूट असावे. पाणी आणि ड्रिप नियोजन, झाड खतव्यस्थापन तसेच मोहर लागल्यानंतर फळांची संख्या वाढवण्यासाठी फळांचा आकार बनवण्यासाठी, आकर्षक कलर येण्यासाठी कोणती काळजी घ्यावी यावर उपाययोजना कोणत्या कराव्यात? सद्या वातावरण डिंक रोगामुळे झाड वाळते, मोहर गळ, गुच्छ रोग यामुळे एकाच फांदीला अनेक पाने फुटतात त्यामुळे फांदी निर्जिव होते. यावरही अनमोल मार्गदर्शन आंबा बागतज्ञ डॉ. बी एम कापसे यांनी केले. यवेळी शेकडो अंबाबाग शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन जीवा वाडी येथील प्रगतशील शेतकरी तथा आंबा बागायतदार युवराज महादेव चौरे आणि सत्यनारायण बळीराम चौरे यांनी केले होते. यावेळी आंबा बाग लागवड त्यावर शासनाच्या वेगवेगळ्या योजना याविषयी केज कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी पी.सी. कोठावळे, कृषी सहाय्यक डी डी जाधव, कृषी सहाय्यक डी व्ही चौरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच अंबा बागेतील कोतत्याही समस्येसाठी राजेंद्र चंद्रकांत नेहरकर ९५२९७५१८८४, भागवत गोवर्धन मुंडे ९८२२२२०२९२ यावर शेतकरी संपर्क साधू शकतात.

## शेख महमदरफी यांचा जिल्हा अधिकारी यांनी प्रशस्तीपत्र देऊन केला सन्मान

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात सहशिक्षक प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले शेख महमदरफी अमीर यांच्या प्रामाणिक,कार्यक्षम व जनहिताकारी सेवांचा २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनी त्यांचा गौरव करण्यात आला निवडणूक प्रक्रियेत दिलेले उत्कृष्ट योगदानाबद्दल बीड जिल्हा अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.**

निवडणूक आयोगाच्या अधिनिस्त राहून लोकसभा, विधानसभा,जिल्हा परिषद, पंचायत समिती,ग्रामपंचायत, पदवीधर व शिक्षक मतदार संघातील निवडणुका सुरळीत पार पाडणे तसेच मतदार यादी तयार करणे व ती अचूक ठेवण्याचे अत्यंत जबाबदारीचे काम महमदरफी शेख सर यांनी अत्यंत काटेकोरपणे व निष्ठेने पार पाडले. सर्वसामान्य नागरिकांना आपलासा वाटणारा प्रतिनिधी म्हणून त्यांनी कोणतीही तडजोड न करता पारदर्शक व विश्वासार्ह कार्यपद्धतीने काम केले, याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रशासकीय कार्यासोबतच शेख महमदरफी सर यांनी कला, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. गायन व लोकगीत स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक, राष्ट्रीय समूहगायन स्पर्धेत प्रथम क्रमांक, जिल्हा दारूबंदी प्रचार मोहिमेत प्रथम क्रमांक,



तसेच वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान त्यांनी मिळविला आहे. चैतन्य भारती संस्थेमार्फत सुजनशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा सन्मान झाला असून, धारूर येथे युवा,कला,गौरव पुरस्कार व सम्राट अशोक राज्यस्तरीय पुरस्कार यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनीही त्यांना गौरविण्यात आले आहे.जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मिळालेला हा सन्मान त्यांच्या यशात आणखी एक मानाचा तुरा ठरला असून, या गौरवामुळे संपूर्ण वडवणी तालुक्यात महमदरफी यांच्या कार्याची प्रशंसा व चर्चा होत आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २९ जानेवारी २०२६




## थोडक्यात



### मोठेवाडी जि.प.शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच सत्यभामा दळवी, उपसरपंच सुभद्रा खेत्री,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नाथाराव रासवे,उपाध्यक्ष विलास खेत्री,मा.सरपंच अविनाश गोंडे, मा.जि.प.सदस्य शिवप्रसाद खेत्री, जगन्नाथ खेत्री, सेकेटरी भिमराव सोळंके,चेअरमन संभाजी चव्हाण, भारत खेत्री,शिक्षक, उत्तम ढवळे,रावसाहेब राठोड,शिक्षक उत्तमराव ढवळे,रावसाहेब राठोड,सतीष डोने,वसंत टाखाणखार, शिवाजी व्यव्हारे, रूपाली बडवे, मनीषा गुळवे, अंगणवाडीताई, उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी महामानवांची वेशभूषा, भाषण, देशभक्ती गीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रस्तावित मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांनी केले तर आभार गेणू पवार यांनी मानले. विद्यार्थी,पालक, शिक्षण प्रेमी व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.




### श्री सिद्धेश्वर विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७:४५ वा शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, महाविद्यालय समितीचे अध्यक्ष अभय कोकड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, शिशु विहार चे अध्यक्ष लक्ष्मीकांत कुलकर्णी, सीबीएसई चे अध्यक्ष तेजस महाजन, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अड रवींद्र कानडे, डॉ स्वानंद कुलकर्णी, स्थानिक सर्व संस्था सभासद तसेच प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती गिरी, सीबीएसई च्या श्रीमती वंदना मिटकरी, शिशु विहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी, माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी पालक, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात भारत माता व संविधान यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

### आश्रुबा घोडके यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील मोठेवाडी येथील आश्रुबा भाऊराव घोडके यांचे दि.२७ जानेवारी मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८३ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि.२७ जानेवारी मंगळवार रोजी सायं ५:०० वाजता मोठेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुलं,सुना,नातवंडे असा परिवार आहे. मोठेवाडी येथील भारत घोडके व बाळासाहेब घोडके यांचे ते वडील होत.

# आष्टी तालुक्यात गावरान कांद्याची विक्रमी लागवड

## ३० हजार हेक्टरवर क्षेत्र; शेतकऱ्यांना चांगल्या उत्पन्नाची आशा

**आष्टी । शरद रेडेकर**

आष्टी तालुक्यात यंदा गावरान कांद्याच्या लागवडीने मोठी भरारी घेतली असून, तब्बल ३० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर विक्रमी लागवड झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. समाधानकारक पावसामुळे जलसाठ्यात झालेली वाढ आणि गावरान कांद्यातून मिळणारे नगदी उत्पन्न लक्षात घेता, शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गावरान वाणाला पसंती दिली आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे तालुक्यातील विहिरी व कूपनलिकांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. कांदा पिकासाठी पोषक असलेले हवामान सध्या उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांचा कांदा लागवडीकडे कल वाढला आहे. विशेषतः खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्यानंतर, रब्बी हंगामात कांदा पीक कष्टाचे चीज करेल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. बीड सांगवी येथील प्रगतशील शेतकरी शहादेव नरवडे यांनी सांगितले की, यंदा पाण्याची सोय चांगली असल्याने आम्ही गावरान कांद्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. बाजारभाव स्थिर राहिले, तर यावर्षी कांदा पीक आमच्या कष्टाचे चीज करेल. सध्या तालुक्यात सर्वत्र एकाच वेळी कांदा लागवड सुरू



असल्याने मजुरांची मोठी टंचाई जाणवत आहे. अनेक ठिकाणी शेतकरी कुटुंबासह स्वतः शेतात राबत असून, काही भागांत बाहेरील जिल्ह्यांतून मजूर आणले जात आहेत. 'कांदा लावणी'मुळे ग्रामीण भागात मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

गावरान कांदा दीर्घकाळ साठवणुकीस योग्य असल्याने शेतकऱ्यांना बाजारभाव वाढेपर्यंत तो साठवून ठेवता येतो. चवीला तिखट, दर्जेदार आणि टिकाऊ असल्यामुळे ग्राहकांकडून या कांद्याला मोठी मागणी असते. इतर संकरित वाणांच्या तुलनेत गावरान कांद्याला बाजारपेठेत नेहमीच दोन पैसे जास्त दर मिळतो.

याबाबत माहिती देताना तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे म्हणाले, तालुक्यात यंदा गावरान कांद्याची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली आहे. शेतकऱ्यांनी लागवडीचा खर्च कमी करण्यासाठी शासनाकडून उपलब्ध असलेल्या कांदा लागवड यंत्र अनुदानाचा लाभ घ्यावा. तसेच करपा व इतर रोगांपासून संरक्षणासाठी वेळोवेळी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाचा उपयोग करावा. एकूणच यंदाचा कांदा हंगाम शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुबत्तेचा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आदित्य अध्यापक महाविद्यालयाचे 'ज्ञान अंकुर' शिबिर उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार आदित्य अध्यापक महाविद्यालय, बीड यांच्या वतीने बी.एड द्वितीय वर्षातील छात्र अध्यापकांसाठी 'ज्ञान अंकुर' आंतरवासिता (छात्रसेवा काल) शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड येथे विविध शैक्षणिक व कृतीयुक्त उपक्रम राबविण्यात आले.**

बी.एड अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या प्रात्यक्षिक कार्याच्या निमित्ताने हे शिबिर संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पाच तास चाललेल्या या कार्यक्रमाला ३२० विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय माध्यमिक



**कृतीयुक्त शिक्षणाचा आदर्श उपक्रम : बी.एड द्वितीय वर्ष छात्र अध्यापकांच्या आंतरवासिता शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**

व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य डी.ओ. तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे ए.आय. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य एम.बी. बावणे ,आर. ए. कारगुडे, प्रा.आय.आर. सय्यद ,बी. एस. जगताप ,एम.सी. चवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ए.आय. पाटील यांनी मनोगतात आदित्य अध्यापक महाविद्यालयाच्या छात्र अध्यापकांचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे उपक्रमशील राहून शिस्त, गुणवत्ता व समाजाभिमुख दृष्टिकोन जोपासावा, असे मार्गदर्शन केले.

या शिबिरामागील उद्देश छात्र अध्यापकांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे तसेच प्रात्यक्षिक व कृतीयुक्त शिक्षण पद्धतीचा प्रभावी अनुभव देणे हा होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.एड द्वितीय वर्षाच्या छात्र अध्यापकांनी केले. महाविद्यालयाने असे उपक्रम राबवून आम्हाला एक वेगळे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन बी.एड द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक शिवाजी साळुंखे यांनी केले, तर आभार आशिष वारे यांनी मानले. हा उपक्रम प्राचार्य मनीषा बावणे यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वी पार पडला.

आदित्य अध्यापक महाविद्यालयाचा गुणवत्तेचा ठसा- प्राचार्य एम.बी. बावणे

आदित्य अध्यापक महाविद्यालय, बीड हे केवळ शिक्षक घडवणारे महाविद्यालय नसून भावी शिक्षकांना कृतीयुक्त, अनुभवाधारित व समाजाभिमुख शिक्षणाची दिशा देणारी संस्था म्हणून ओळखले जाते. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जातात. 'ज्ञान अंकुर' आंतरवासिता शिबिरासारख्या उपक्रमांमुळे छात्र अध्यापकांना प्रत्यक्ष शाळा स्तरावर काम करण्याची संधी मिळून त्यांचा आत्मविश्वास, नेतृत्वगुण व अध्यापन कौशल्य अधिक प्रगल्भ होत आहे.

## पान ६ वरुन...

### सिंदफना नदीपात्रात

रु. २०,००,०००/-) व वाळू (अंदाजे किंमत रु. १०,०००/-) असा एकूण रु. २०,१०,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचनामा करून सदर वाहन व वाळू पिंपळनेर पोलीस ठाणे आवारात सुरक्षित ठेवण्यात आली आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १८/२०२६ अन्वये आरोपीविरुद्ध कलम ३०३(२) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३०/१७७, ३९/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार, यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस अंमलदार सादीक पठाण, सोनवणे, पवार यांनी केली आहे.

### फुलेपिपळगाव येथे

मा राहुल टाकणकर सर भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,चंद्रभागा ट्रॅव्हल्स व टूर्स यांचे मालक प्रल्हाद दळवी ,माजी ग्रामपंचायत सदस्य ,मा.राजेभाऊ खामकर हे होते या दोन महिन्याच्या कालावधीत ज्यांनी अथाक परिश्रम घेऊन भारतीय संविधानाचे वाचन व स्पष्टीकरण दिले ते भारतीय बौद्ध महासभा जिल्हा उपाध्यक्ष मा एस बी मोरे साहेब व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन सचिव व नाथ हाईस्कूल नाथापुरचे मुख्याध्यापक मा के व्ही साळवे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच उपस्तीत मान्यवर व दररोज संविधान ऐकण्या साठी उपस्तीत आसणा-यांचा भारतीय संविधान देऊन सन्मान करण्यात आला सार्वजनिक भारतीय संविधान कार्यक्रमाचा उद्दिष्ट असं होता की भारतीय संविधानामध्ये काय लिहिले आहे ते डोक्यावर न घेता ते प्रत्येक नागरिकाच्या डोक्यात व कृतीत असले पाहिजे त्यामुळे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आसल्याचे आयोजक श्रीराम कोरडे यांनी प्रस्ताविकात सांगीतले प्रमुख मान्यवरांनी संविधानाबद्दल अनमोल असे विचार संविधानाचे महत्त्व व इतर माहिती यावेळी सांगण्यात आली. तसेच अध्यक्षिय भाषणातुन माजलगाव चे तहसीलदार मा.संतोष रुईकर साहेब यांनी आपले अनमोल विचार सांगताना म्हटले की भारतीय संविधान हा आपल्या जीवन सेनेतील एक अभिभाज्य घटक आहे त्यामुळेच आज आपण एवढ्या स्वातंत्र, बंधुता न्याय इतर मूल्य चे अनुकरण करून आज आपण सुखी जीवन जगत आहे तसेच प्रत्येकाने भारतीय संविधानातील, मूल्यांचा, तत्वे नियम ,कलम , कर्तव्य,अंगीकार केल्यानंतर आपल्या देशात खरी लोकशाही गणराज्य येईल असे प्रतिपादन केले या कार्यक्रमासाठी मा. राजेश गुंजाळ, , मा.श्रीराम उंबरे,रंगनाथ कोरडे , .वंचाबाई साळवे , अंजली साळवे, लता ढे गायकवाड मॅडम, प्रज्ञा डोंगरे,गंगुबाई डोंगरे , महानंदा साळवे,सिद्धांत साळवे, अजिंक्य साळवे, उत्कर्ष भाग्यवंत , आदर्श पौळ,सह गावकरी उपस्तीत होत.

### ऑनलाइन सट्टा खेळणाऱ्या

मिळुन त्यांच्या सर्वाच्या आर्थिक फायद्याकरीता लोकांना जास्त पैसे मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन विनापरवाना बेकायेदशिररित्या ३६५ अँपमध्ये विविध खेळावर ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करून घेवुन जुगार खेळत व खेळवित असतांना लॅपटॉप, टॅब, मोबाईल फोन असा एकुन ५,२६,०००/-रूपयाच्या मुद्देमालासह मिळुन आले. म्हणुन वरील सर्व आरोपी विरूध्द पोस्टे बीड ग्रामिण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

### आष्टी मतदारसंघाच्या विकासात

यांचे खूप मोठे योगदान लाभले आहे.कणखर, करारी आणि स्पष्टवक्ता विकासपुरुष महाराष्ट्राने गमवल्याचे अत्यंत वेदनादायी दुःख होत आहे. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन. महाराष्ट्राला विकासाची दिशा देणाऱ्या स्पष्ट निर्भीड करारी बाणा असलेलं नेतृत्व आज आपल्यातून निघून गेल्याने खूप मोठी हानी झाली आहे मला त्यांच्याबरोबर काम करण्याचा योग आला आपल्या कामात अतिशय तत्पर आणि कमालीची निष्ठा मला पहावयास मिळाली मी ज्या ज्या वेळी त्यांच्यासमोर कामाच्या फाईल घेऊन गेलो विकास कामाबाबत त्यांनी कधीही नाही म्हटले नाही आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघामध्ये अजितदादा पवार यांनी मोठ्या प्रमाणात विकास कामे मंजूर केली मतदारसंघातील सर्वसामान्य जनता अजित दादांना कधीही विसरणार नाही सामान्य माणसाच्या मनामध्ये त्यांनी आपल्या कामातून घर केलं होतं . महाराष्ट्राचा धुरंधर नेतृत्व करणारे अजित दादा पवार हे गेल्याने प्रत्येक घरातील माणसांना दुःख झाले आहे .त्यांच्या अपघाती निधनाने अत्यंत दुःख होत असून दादांना विसरणं कदापि शक्य नाही त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील. अशा भावना माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी व्यक्त केल्या.

### महाराष्ट्रासह बीड झाला

महाराष्ट्राच्या राजकातील दिग्गजांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रचंड लोकप्रियता मिळवलेल्या नेत्यांमध्ये स्व.गोपीनाथराव मुंडे, मराठा आरक्षणाचे खंदे समर्थक स्व.विनायकराव मेटे यांचाही अपघातील मृत्यू झाला. हे गुढ नेमके उकललेले नसतांना बारामतीत पुन्हा असा मोठा अपघात होवून राज्यातील मोठा नेता अशा प्रकारे आपल्यातुन निघुन जातो. ही बाब नक्कीच विचार करायला लावणारी आहे.आणि त्यासोबतच महाराष्ट्र सह बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे अजित दादा पालकमंत्री झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील नागरिकांची खूप मोठी अपेक्षा दादांकडून होती ती अपेक्षा पूर्ण करणारा असा मोठा दिलदार व प्रशासनावर वचक असणारा नेता राहिला नाही ही खंत आता बीड जिल्ह्यात वासियांना राहणार आहे.

## पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध; नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील पत्रकारांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आज नगराध्यक्ष आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा यांचा सन्मान करण्यात आला.

दीर्घकाळापासून पत्रकार भवनासाठी जागेची मागणी प्रलंबित होती. नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रक्रिया पूर्ण करून यशवंतराव चव्हाण चौक या ठिकाणी असलेल्या अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलाच्या लगत जागा उपलब्ध करून दिल्याने पत्रकार वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आसुन नंदकिशोर जी मुंदडा यांनी पत्रकारांची गेल्या अनेक वर्षाची मागणी पूर्ण केल्या मुळे अंबाजोगाई तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नंदकिशोर जी मुंदडा यांच्या



निवासस्थानी जाऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी मराठी पत्रकार परिषद हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्तात्रय आंबेकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय रानभरे, तालुका अध्यक्ष प्रशांत लाटकर, सचिव वीरेंद्र गुप्ता, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रकाश बोरगावकर, कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी, हल्ला विरोधी कृती समिती तालुका निमंत्रक अशोक दळवे, गोविंद खरटमोल, व्यंकटेश जोशी, मोहम्मद फैजान, परमेश्वर वैद्य, प्रशांत मस्के, वसुदेव शिंदे, सलीम गवळी आदीसह या कामी पुढाकार घेणारे वाईस ऑफ मीडियाचे अतुल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व उपस्थित पत्रकारांनी नगराध्यक्षांच्या या निर्णयाचे स्वागत करत त्यांच्या कार्याबद्दल आभार व्यक्त केले. पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि सुविधांसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याचे आणि आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या माध्यमातूनच निधी उपलब्ध करून अंबाजोगाई पत्रकार भवनाची भव्य इमारत या ठिकाणी उभी राहील असा विश्वास यावेळी सर्व पत्रकार बांधवांनी व्यक्त केला.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजनेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील ग्रामीण भागातील शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी पूर्णपणे यंत्र सामुग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे करण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती असलेली ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना'' ही स्वतंत्र योजना महसूल विभागामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, स्थापन करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी यांना तालुकास्तरावर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीस्थापन करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णयातील सुचनेनुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रकरणात सर्व यंत्रणा गटविकास अधिकारी, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना सदर योजना प्रभावीपणे राबवीण्याबाबत दिनांक १२/०१/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी बीड यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे बैठक आयोजित करून आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.आज दिनांक २६/१२/२०२६ रोजी ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना'' अंतर्गत बीड जिल्ह्यातील एकूण ५६ पाणंद रस्ता, गाव रस्ता, शिव रस्ता खुला करून सिमांकन करून देण्यात आलेले आहे. तसेच सदर ग्रामपंचायत यांना सदर रस्त्याचे मजबूती करण करण्यासाठी ग्रामसभेमधे ठराव घेऊन प्रस्ताव तालुकास्तरावर विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती मार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्या बाबत सूचना दिलेल्या आहेत.

मा. जिल्हाधिकारी बीड यांचे कडून सर्व शासकीय कंत्राटदार आय यंत्र मालक अवगत करण्यात येते की, शासनाकडून दि. २८/०१/२०२६ रोजी सदर योजणेकरिता निविदा प्रसिद्ध करण्यात येणार असून यामध्ये जास्तीतजास्त कंत्राटदारांनी व यंत्र मालकानी सहभाग नोंदवून निविदा भरावी असे आवाहन जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींना जि. बीड आपल्या गावातील रस्ते, शेत रस्ते, पाणंद रस्ते अतिक्रमीत असतील तर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी तहसीलदार यांचे कडे संपर्क करावा व अतिक्रमण मुक्त सिमांकन झालेले रस्ते चा प्रस्ताव मान्यतेसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीकडे सादर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुनंदगाव जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालयात संयुक्तरित्या प्रजासत्ताक दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून अवघ्या एक ते दीड किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या पुनर्वसन भागातील पूनंदगाव येथील जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी गावचे प्रथम नागरिक सरपंच सौ.अश्विनी रोहिदास कुरे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आला तर जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा सौ.पुनम आनंत घडसिंगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहण करण्यात आले.

या गावच्या शाळेने एक आदर्श निर्माण केला आहे

या शाळेत प्रत्येक वेळी काही ना काही असे उपक्रम घेतले जातात की,



त्याची चर्चा या परिसरात मोठ्या प्रमाणात होत असते. अशाच काही शानदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ध्वजारोहणानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. छोट्या, मोठया मुलांनी देशभक्तीपर भाषण केली. गीत गायन केले, वेगवेगळ्या गाण्या वर नृत्य सादर केले. यावेळी पाचवीच्या वर्गातील समृद्धी सतीश काकडे या विद्यार्थिनीच्या नृत्याने तर उपस्थितांचे मन जिंकली.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक गणगे, शिक्षक कटारे, बेद्रे, मोठे मॅडम यांनी मोलाचं मार्गदर्शन केलं. यावेळी अंगनवाडी कारकर्ता, मदतनीस अशा वर्कर यांचं ही सहकार्य राहील. या कार्यक्रमास गावचे माजी.सरपंच पांडुरंग घडसिंगे, रुद्रा कुरे, पत्रकार आनंत घडसिंगे ,पत्रकार सिद्धेश्वर गायकवाड, सुनील कुरे, भारत घडसिंगे, राजेभाऊ शिंदे , प्रशांत घडशिंगे, मच्छिंद्र शिरसागर ,भीमराव घडसिंगे,रामेश्वर गायकवाड, रामभाऊ घडशिंगे, रामेश्वर मुरकुटे, दादा क्षीरसागर, सतीश काकडे , प्रल्हाद कुरे, परमेश्वर मुळे, अंकुश गालफाडे, रावसाहेब महाराज कुरे,अनंत महाराज शेंडगे, पाचनकर साहेब, बाळू शिंदे, अर्जुन अवचार, शेखर सावंत, अशोक कुंभारसह युवक,महिलाचि मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## ज्ञानदीप विद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र, किल्ले धारूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी ध्वजारोहण शहरातील प्रतिष्ठीत नागरीक व सामाजीक कार्यकर्ते दुष्यंतकुमार तिवारी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुण



गोपाळजी गोरे, भारत शेळके, महादेव सव्वासे, नागनाथ सोनटक्के, दत्ताभाऊ सुरवसे, प्रवीण शेटे याची उपस्थीती होती. यावेळी महापुरूषाचे प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रभातफेरी, स्काऊट गाईड संचलन, देशभक्तीपर गीतगायन, विद्यार्थी वाढदिव, सांघिक खेळाचे बक्षीस वितरण, संगीत कवायत, लेझिम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार मुंजाराम निरडे यांनी केले या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकऱ्यासाठी मोठा बदल?

दिल्ली / वृत्तसंस्था

भारताने उद्योग, सेवा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती केली असली, तरी देशाची अर्थव्यवस्था शेतीवर खूप अवलंबून आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात शेतीवर रोजीरोटी कमावते. त्यामुळे शेतीला अधिक नफ्याची आणि टिकाऊ बनवण्यासाठी धोरणात्मक बदल गरजेचे आहेत.सध्या शेती आणि संबंधित क्षेत्रांचा जीडीपीतील वाटा सुमारे १७-१८ टक्के आहे. या क्षेत्रातून जवळपास निम्म्या लोकसंख्येला रोजगार मिळतो.

शेती फक्त अन्नधान्य उत्पादनापुरती मर्यादित नसून, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, फळबागा, कृषी प्रक्रिया आणि तंत्रज्ञान क्षेत्रातही विस्तारत आहे.तंत्रज्ञानामुळे उत्पादन वाढत आहे, पण त्याचा फायदा सर्व शेतकऱ्यांपर्यंत जात नाही. देशातील सुमारे ८६ टक्के लहान व सीमांत शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाहीत कारण त्यांच्याकडे पुरेशी संसाधने नाहीत. त्यामुळे अर्थसंकल्पात तात्पुरते अनुदान देण्यापेक्षा दीर्घकालीन सुधारणा करणे महत्त्वाचे ठरेल.लहान शेतकरी आणि बाजाराशी कमकुवत जोडणी या समस्या सोडवण्यासाठी एफपीओ (शेतकरी उत्पादक संघटना) आणि उत्पादन क्लस्टर मॉडेल उपयुक्त ठरू शकतात. यामुळे शेतकरी एकत्र येऊन उत्पादन वाढवू शकतात, खर्च कमी करू शकतात आणि बाजारात मजबूत सौदेबाजी करू शकतात. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात एफपीओला अधिक मदत आणि संधी देण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील तरुण आणि महिलांसाठी कृषी-उद्योजकता मोठी संधी आहे. रोपवाटिका, माती परीक्षण, डिजिटल सल्ला, इनपुट पुरवठा आणि बाजार जोडणीसारख्या सुविधा अधिक लोकांपर्यंत पोहोचवल्यास रोजगार निर्मिती होऊ शकते. या साठी स्टार्टअप्सना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि इनक्यूबेशन सेंटरची आवश्यकता आहे.शेती पावसावर खूप अवलंबून असल्यामुळे पाणी व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. हवामान बदलामुळे अनिश्चितता वाढली आहे, त्यामुळे जलसंधारण, भूजल पुनर्भरण, सूक्ष्म सिंचन, सौर पंप आणि सामुदायिक पाणी व्यवस्थापनावर अधिक गुंतवणूक करणे गरजेचे आहे. नैसर्गिक आणि पुनरुज्जीवनक्षम शेती पद्धती स्वीकारल्यास खर्च कमी होतो, माती आरोग्य सुधारते आणि शेतकरी हवामान बदलाशी जुळवून घेऊ शकतो. पीक विमा, हवामान-आधारित सल्ला आणि हवामान-सहिष्णु बियाण्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल.१०० कमी उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. पंतप्रधान 'धन-धान्य 'कृषी योजना या जिल्ह्यांमध्ये पीक विविधीकरण, सिंचन, साठवणूक आणि कर्जपुरवठा यांना प्राधान्य देईल. शेतकऱ्यांसाठी कृषी कर्जाचे लक्ष्य १५-२० टक्क्यांनी वाढवणे आवश्यक आहे, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा चालना मिळेल.



## सोयाबीन तेल आयात रद्द !

पुणे : भारताच्या खाद्यतेल बाजारात सध्या मोठे बदल होत आहेत. जागतिक स्तरावर किमती वाढत आहेत, डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत कमी होत आहे आणि देशांतर्गत बाजारातील दरांवरही याचा परिणाम दिसतो आहे. याचा थेट परिणाम सोयाबीन तेलाच्या आयातीवर झाला आहे. त्यामुळे भारतातील आयातदारांनी दक्षिण अमेरिकेतून होणाऱ्या मोठ्या प्रमाणावर सोयाबीन तेल आयातीचे करार रद्द केले आहेत.


आयात करार रद्द होण्यामागील मुख्य कारण म्हणजे ब्राझील आणि अर्जेंटिनामधून येणारे सोयाबीन तेल देशांतर्गत उपलब्ध तेलापेक्षा प्रति टन ३० ते ३५ डॉलरने जास्त महाग पडत आहे. यामुळे आयातदारांवर जास्त खर्चाचा ताण येत आहे. त्यातच डॉलरच्या तुलनेत रुपयाचे सतत अवमूल्यन होत असल्याने आयात आणखी महाग पडत आहे. गेल्या काही महिन्यांत रुपयाचा विनिमय दर सातत्याने कमजोर झाला आहे. याचा थेट परिणाम आयातदारांवर झाला आहे कारण त्यांना परकीय चलनात जास्त रक्कम मोजावी लागते. कच्च्या सोयाबीन तेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्या प्रति टन १,२४० डॉलरच्या पुढे गेल्या होत्या. परिणामी, सोयाबीन तेलाची किंमत कच्च्या पाम तेलाच्या तुलनेत जास्त राहिली आहे. जागतिक बाजारातही दबाव आहे. अमेरिकेत अक्षय इंधन धोरणांतर्गत बायोमास-आधारित डिझेल उत्पादनाला चालना देण्यात येत आहे. यासाठी सोयाबीन तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने मागणी वाढली आहे. तसेच, चीनने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्याचे संकेत दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात दर वाढले आहेत. देशांतर्गत पातळीवर मात्र शेतकऱ्यांसाठी दिलासा आहे. मध्य प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये भावांतर योजनेमुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळतो आहे. खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन विक्री झाली आहे. यामुळे शेतकरी, प्रक्रिया उद्योग आणि सरकार या तिन्हींना फायदा होत आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. जागतिक घडामोडी, चलन विनिमय दरातील बदल आणि देशांतर्गत धोरणांचा एकत्रित परिणाम म्हणून येत्या काळात खाद्यतेल बाजार चंचल राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आयातदारांसह ग्राहकांनाही किमतींच्या बाबतीत सावध राहावे लागणार आहे.

भारताच्या सोयाबीन तेल आयातीची स्थिती : डिसेंबरमध्ये भारताची सोयाबीन तेल आयात काहीशी वाढली होती. अर्जेंटिना आणि ब्राझीलकडून मोठ्या प्रमाणात तेल आयात झाले तरी, मागील वर्षाच्या तुलनेत नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये एकूण शिपमेंट फारशी वाढलेली नाही. त्यामुळे आगामी काळात आयात धोरण अधिक सावधगिरीने आखले जाईल, असे अपेक्षित आहे.

## शेतीसोबत ससेपालन व्यवसाय देता लाखोंची कमाई!

ससा हा असा प्राणी आहे, जो प्रत्येक व्यक्तीला आवडतो. दिसायला अतिशय सुंदर आणि मनमोहक आहे, जे पाहून लोकांचे मन आनंदाने आणि प्रेमाने भरून जाते. ससेपालन शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरू शकते. शेतीसोबत शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेतकरी ससेपालनाचा व्यवसाय करू शकतात. यातून मिळणारा फायदाही चांगला मिळू शकतो.

प्राणीप्रेमींचा ससा हा अतिशय गोंडस प्राणी आहे. शहरांमध्ये छंद म्हणूनही त्याचे संगोपन केले जाते. शिवाय व्यवसाय म्हणून देखील ससा पालन केला जातो. ससेपालन पिंजऱ्यात चांगले होऊ शकते. महत्वाचे म्हणजे पिंजऱ्यात स्वच्छता राहते. ससे पाळताना त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी लाकडाचा भुसा टाका कारण त्यांना उकरण्याची सवय असते. भुसा टाकला की ससे तिथेच उकरत बसतील. म्हणजे बाहेर जाण्याची किंवा पळून जाण्याची शक्यता कमी असते.



असा सुरू करा 'हा' व्यवसाय : सर्वप्रथम ससे व्यवसायासाठी अशी जागा निवडा. जिथे कमी वायू आणि ध्वनी प्रदूषण आहे. तसेच, २५ अंश सेंटीग्रेड तापमान आणि सूर्यप्रकाश असावा. कारण अशा ठिकाणी ससा व्यवसाय करणे सोपे जाते. अशा ठिकाणी ससे चांगले वाढतात. तुम्ही १० मादी ससे आणि २ नर सशांसह ससा पालन सहज सुरू करू शकता. चांगल्या नफ्यासाठी किमान १०० ससे असावेत. जर तुम्हाला सशाच्या व्यवसायातून अधिक कमाई करायची असेल तर तुम्ही आणखी सशांचे संगोपन करु शकतात.

हा लागतो आहार : सशाचा आहार धान्य, गोळ्या किंवा पावडरच्या स्वरूपात असतो. हिरव्या चाऱ्यामध्ये सशांना ओट्स, बेरसीम, राई गवत इत्यादी खायला दिले जाऊ शकते. यांच्या पिल्लांना देखील धान्य बारीक करून खायला द्या. बुरशी लागलेले धान्य शक्यतो टाळा. कारण बुरशी धान्यात रोग असतात वेगवेगळे किटाणू असतात. यामुळे सस्याला धोका निर्माण होऊ शकतो. तसेच ससेपालन करणाऱ्याला सुद्धा आर्थिक नुकसान होऊ शकते.

काही प्रमुख जाती : सोव्हिएत चिंचिला, व्हाईट जायंट, ब्लॅक ब्राउन, न्यूझीलंड व्हाईट, ग्रे जायंट, अंगोरा, डच इ. प्रमुख जाती आहेत. ससेपालनासाठी उत्तम ठरतील.

ससा पालनाचा खर्च : तुम्ही १०० सशांसह रॅबिट फार्मिंग बिझनेस प्लॅन करू शकतात. यासाठी सुमारे २ लाख रुपये खर्च असेल आणि त्याच वेळी पिंजरा, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था इत्यादीसाठी तुम्हाला किमान अडीच ते तीन लाख रुपये खर्च करावे लागतील. या व्यवसायात एकदा पैसे गुंतवले की फायदा चांगला मिळतो. ससा ३५ ते ४५ दिवसांत आपल्या पिल्लांना जन्म देतो आणि ही पिल्ले ४ महिन्यांची झाली की विक्रीसाठी तयार होत असतात. ससे मुख्यतः मांस आणि लोकरीसाठी पाळले जातात. त्याची मांस उत्पादकता बाजारातील इतर सर्व प्राण्यांपेक्षा जास्त आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८० : जेम्स ऑगस्टस हिकी यांनी 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर' या नावाने एक साप्ताहिक सुरू केले. पुढे याचे वर्तमानपत्रात रुपांतर झाले. 'हिकी'ज बेंगॉल गॅझेट' या नावाने ओळखले जाणारे हे वृत्तपत्र म्हणजे भारतातील पत्रकारितेची सुरुवात मानली जाते.

१८६१ : कॅन्सास हे अमेरिकेचे ३४ वे राज्य बनले.

१८८६ : कार्ल बेंझ याला जगातील पहिल्या इंजिनवर चालणार्या मोटरगाडीचे पेटंट मिळाले.

१९७५ : इंडियन नॅशनल थिएटर निर्मित आणि पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या 'ती फुलराणी' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईतील रविंद्र नाट्यमंदिर येथे झाला.

१९८९ : हंगेरीने दक्षिण कोरियाबरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२७४ : संत निवृत्तीनाथ (मृत्यू: १७ जून १२९७)

१७३७ : थॉमस पेन अमेरिकन विचारवंत, राजकारणी आणि क्रांतिकारक (मृत्यू: ८ जून १८०९)

१८४३ : विल्यम मॅक किनले अमेरिकेचे २५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९०१)

१८५३ : मधुसूदन राव आधुनिक ओडिया साहित्याच्या तीन प्रवर्तकांतील एक प्रवर्तक. ओरिसावर मराठ्यांचे राज्य असताना महाराष्ट्रातून जी कुटुंबे ओरिसात जाऊन स्थायिक झाली, त्यांपैकी एका कुटुंबात जन्म. (मृत्यू: १९१२)

१८६० : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (मृत्यू: १५ जुलै १९०४)

१८६६ : रोमें रोलाँ साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१५) विजेते फ्रेन्च लेखक, नाटककार व संगीत समीक्षक (मृत्यू: ३० डिसेंबर १९४४)

१९२२ : प्रो. राजेंद्र सिंग ऊर्फ 'रज्जू भैय्या' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ४ थे सरसंघचालक (मृत्यू: १४ जुलै २००३)

१९२६ : डॉ. मोहम्मद अब्दूस सलाम भौतिकशास्त्रज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते (१९७९) एकमेव पाकिस्तानी, विज्ञानातील नोबेल पारितोषिक विजेते एकमेव मुस्लिम (मृत्यू: २१ नोव्हेंबर १९९६ ऑक्सफर्ड, इंग्लंड)

१९५१ : अँडी रॉबर्टस वेस्ट इंडिजचा जलदगती गोलंदाज

१९७० : राज्यवर्धनसिंग राठोड ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता भारतीय नेमबाज

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५९७ : महाराणा प्रताप मेवाडचा सम्राट (जन्म: ९ मे १५४०)

१८२० : जॉर्ज (तिसरा) इंग्लंडचा राजा (जन्म: ४ जून १७३८)

१९३४ : फ्रिटझ हेबर नायट्रोजनपासून मोठ्या प्रमाणावर अमोनिआ वायू मिळवण्याची पद्धत शोधल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळालेले (१९१८) जर्मन रसायनशास्त्रज्ञ. (जन्म: ९ डिसेंबर १८६८ वॉक्लॉ, पोलंड)

१९६३ : रॉबर्ट फ्रॉस्ट अमेरिकन कवी (जन्म: २६ मार्च १८७४)

१९६३ : सदाशिव आत्माराम जोगळेकर लेखक व संपादक. अहिल्या आणि इतर कथा, घारापुरी (१९४८), संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, सुलभ विश्वकोश ही त्यांची काही पुस्तके आहेत. (जन्म:)

१९९३ : रँग्लर गोपाळकृष्ण लक्ष्मण चंद्रात्रेय गणितज्ञ (जन्म:)

१९९५ : रुपेश कुमार रुपेरी पडद्यावरील खलनायक, निर्माते व दिग्दर्शक (जन्म:)

२००० : पांडुरंग सावळाराम तथा काका वडके शिवसेना नेते (जन्म:)

२००० : देवेन्द्र मुर्डेश्वर बासरीवादक (जन्म:)

२००१ : राम मेघे महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री (जन्म:)

## उन्हाळी दोडका लागवड तंत्रज्ञान

दोडका हे भाजीपाला शेतीतील एक महत्त्वाचे पीक मानले जाते. या पिकाला बाजारात चांगली मागणी आहे आणि ते कमी कालावधीत भरपूर आर्थिक फायदा मिळवून देण्यारे पीक म्हणून देखील प्रचलित आहे. यामध्ये भरपूर खनिजे आणि पोषणतत्त्वे असतात, ज्यामुळे त्याला आरोग्यदायी खाद्यपदार्थ म्हणून महत्त्व प्राप्त आहे.

जमीन व हवामान : दोडका पिकाची वाढ साठी मोकळी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी व हलकी ते मध्यम जमीन आदर्श ठरते. तसेच, सेंद्रिय खतांचा पुरवठा नियमितपणे होणारी जमीन देखील या पिकाच्या वाढीस उपयुक्त आहे. या पिकाला उष्ण व दमट हवामानाची आवश्यकता असते, ज्यामुळे २५ ते ३० अंश से.मी. तापमानाचा पातळी हे त्याच्या वाढीसाठी आदर्श मानले जाते. यामुळे या पिकाची लागवड विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटका आणि गुजरातसारख्या राज्यांत चांगली होऊ शकते.

पूर्वमशागत : लागवडीसाठी जमीन तयार करण्यासाठी प्रथम नांगरणी करून तिचे भुईसमान सुगम करणे आवश्यक आहे. त्यानंतर कुळवणी करून काडीकचरा वेचला जातो, जेणेकरून त्यातील अवशिष्ट पदार्थ काढून टाकता येतात. उभी नांगरणी केल्यानंतर ढेकळे फोडून वखरणी करणे आवश्यक आहे. यासाठी हेक्टरी ३० ते ४० गाड्या चांगले कुजलेले शेणखत वापरणे महत्त्वाचे आहे.

लागवडीची वेळ व पद्धत : दोडका पिकाची लागवड मुख्यतः खरीप हंगामात (मे ते जून) व उन्हाळी हंगामात (जानेवारी ते फेब्रुवारी) केली जाते. लागवडीसाठी १.५ ते २ १ ते १.५ मीटर अंतरावर पाट काढून लहान आळ्यामध्ये बी टाकावे. प्रत्येक आळ्यात तीन बिया टाकून त्यात दोन निरोगी रोपे ठेवावीत. हेक्टरी ४ ते ५ किलो बियाण्यांची आवश्यकता असते.

सुधारित जाती : दोडका पिकाच्या लागवडीसाठी सुधारित जातींचा वापर केल्यास उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते. काही प्रमुख सुधारित जाती म्हणजे पुसा नसदार, सी ओ-१, फुले सुचिता आणि कोकण हरिता. या जाती जास्त उत्पादन देतात आणि रोग प्रतिकारशक्ती देखील उत्तम असते.

खत व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी शेतात १५ टन शेणखत, २५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश द्यावेत. दोन महिन्यांनी २५ किलो नत्र पुन्हा द्यावे. प्रत्येक आळ्यात दीड ते दोन किलो शेणखत द्यावे, जेणेकरून मुळांचे योग्य पोषण होईल.

पाणी व्यवस्थापन : दोडका पिकाला पाणी नियमितपणे देणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात दर ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. खरीप हंगामात पिकाच्या आवश्यकता आणि जमिनीच्या परिस्थितीनुसार पाणी व्यवस्थापन केले पाहिजे.

वेलींना आधार : दोडक्याच्या वेलांना चांगला आधार देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेल मांडवावर चढविण्यासाठी बांबूच्या शिऱ्या किंवा नायलॉन दोरी वापरणे उचित आहे. साधारणपणे मांडवाची उंची २ मीटर ठेवावी.

आंतरमशागत : दोडका लागवडीला दोन आठवड्यांनी विरळणी केली पाहिजे. प्रत्येक आळ्यात दोन रोपे ठेवून चांगल्या प्रकारे निंदा व स्वच्छता करणे आवश्यक आहे. पीक निरोगी ठेवण्यासाठी २ ते ३ निंदन घेतले जातात.

पिकाचा कालावधी : दोडका पिकाची काढणी साधारणतः ११० ते १२० दिवसांत होऊ शकते.

काढणी व उत्पादन : दोडका पिकाच्या काढणीचा प्रारंभ फळे कोवळी असताना करावा. प्रत्येक फळाची काढणी त्याच्या आकारानुसार आणि योग्य पिकवलेल्या स्थितीत केली पाहिजे. ४५ ते ६० दिवसांनी फळे काढणीस तयार होतात. हेक्टरी १०० ते १५० क्विंटल उत्पादन मिळू शकते, ज्यामुळे शेतकऱ्याला चांगला आर्थिक फायदा होतो.कीड व रोग व्यवस्थापन : दोडका पिकावर मुख्यतः फुलकिडे, मावा, तुडतुडे या किडींचा तसेच भुरी व करपा या रोगांचा प्रादुर्भाव होतो. यासाठी योग्य कीड व रोग नियंत्रण उपाययोजना करणे आवश्यक आहे. फुलकिडे आणि माव्यामुळे होणारे नुकसान नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशकांचा वापर आणि जैविक नियंत्रण पद्धती वापरल्या जातात.



# शरीराची कार्यक्षमता कमी झाल्यावर नव्हे तर तरुणपणातच ग्रंथ वाचन करा-डॉ.बालाजी जाधव

अंबड । प्रतिनिधी

तुकारामांची गाथा, ज्ञानेश्वरी असे विविध विविध ग्रंथ,ज्यांच्यामुळे आपल्या आयुष्याचे कल्याण होते ते आपण आयुष्य संपत संपत आल्यावर हाती घेतो मग तुम्हीच सांगा आयुष्याचे कल्याण कसे होईल असा सवाल उपस्थित करतांनाच आपल्या मुलाने पहिले अक्षर उच्चरायला सुरुवात केली की लगेच त्याला गाथा वाचायला द्या तसेच मुलांना वाढदिवसाला गिफ्ट द्यायला हरकत नाही परंतु त्यासोबतचं त्यांना छोटी गाथाही जरूर द्या असे आवाहन ख्यातनाम लेखक, साहित्यिक तथा किर्तनकार डॉ.बालाजी जाधव यांनी केले. मराठा सेवा संघ अंबड व शिवप्रेमी यांच्या प्रेरणेतून जगदगुरु तुकोबाराय व्याख्यान माला सुरु करण्यात आली असून प्रत्येक महिन्याच्या चौथ्या शनिवारी मान्यवरांचे व्याख्यान होणार आहे. दरम्यान या व्याख्यान मालेचे पहिले पुष्प (ता.२४) डॉ. जाधव यांनी 'युवकांचे प्रेरणास्थान जगदगुरु तुकाराम' या विषयावर गुंफले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी




प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांची तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार संतोष जिगे तसेच नगरसेवक धनराज ठाकूर यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ.जाधव म्हणाले की,संत कोणाला म्हणावे असा मुख्य प्रश्न आहे,ज्याने भगवे वस्त्र परिधान केले,ज्याची दाढी व जटा वाढलेल्या आहेत किंवा जो गुहेत राहतो यांना संत म्हणता येणार नाही तर मानवतेचा उद्धार करणारे, रंजल्या गांजलेल्या लोकांना जे आपले म्हणतात, लोकांच्या कल्याणाची भावना ज्यांच्या कायम अंगी आहे असा प्रत्येक माणूस संत आहे मग त्याने भगवे वस्त्र परिधान केलेले असो किंवा नसो, त्याची दाढी व जटा वाढलेल्या असो किंवा नसोत असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. सध्या सर्वत्र स्वयंघोषित संतांची बजबजपुरी माजलेली आहे तसेच सध्या सोशल मीडियावरही शांत बसायला मी काही संत नाही अशी संतांची चुकीची व्याख्या मांडल्या जातेय. संत म्हणजे काय अन्याय सहन करत निमूट शांत बसणारे असं नाही तर वेळप्रसंगी नाठाळाच्या माथी काठी हाणण्याची धमकही त्यांच्या अंगी असते असे सांगतांनाचं शिक्षण व जागृतीचा काहीही संबंध नाही कारण अनेक शिक्षित लोकंही भोंदू बाबाच्या नादी लागून अंधश्रद्धेला बळी पडतात व स्वतःचे आर्थिक नुकसान करून घेतात.प्रत्येक जण आधी स्वतः सुधारला तर समाज सुधारेल नंतर गाव व राष्ट्र सुधारेल अशी शिकवण संतांनी दिली म्हणून त्यांना आदर्श मानले पाहिजेत. आजच्या युवकांचे आदर्श संत तुकाराम असले पाहिजेत मात्र त्यांचे आदर्श चुकीचे झाले आहेत असे डॉ.जाधव यांनी सांगितले त्याचप्रमाणे देहाला, शरीराला त्रास दिल्यावर संत होता येणार नाही तर मानवतेचे कल्याण झाले पाहिजे.प्रत्येक गोष्टीत एकदम प्राविण्य मिळत नाही त्यासाठी दररोज थोडेथोडे प्रयत्न करावे लागतात,सर्पमित्र जन्माला आल्या आल्या होता येत नाही त्यासाठी दररोज थोडा थोडा प्रयत्न करावा लागतो नंतरच सापं पकडता येतात. जीवनात नैराश्य आले,वेगवेगळे संकटे आली तर निराश होवू नका एकदा तुकारामाची गाथा वाचा. ज्या गोष्टी असाध्य वाटतात त्याही साध्य होतात केवळ अभ्यासामुळेच त्यासाठी अभ्यास केला पाहिजे,सराव केला पाहिजे असे आवाहन करतांनाच डॉ. जाधव पुढे म्हणाले की, आपल्या मुलाचा वाढदिवस असेल तर त्याला गिफ्ट द्यायला हरकत नाही पण एक छोटी तुकारामांची गाथाही जरूर भेट द्यावी.तो आपल्या जीवनात यशस्वी होईल की नाही हे सांगता येणार नाही परंतु तो या देशाचा आदर्श नागरिक मात्र झाल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र खरे आहे. आपण घरी पुस्तके अशा ठिकाणी ठेवतो की कोणालाही सहज सापडत नाही परंतु मोबाईल अगदी कोणालाही सहज घेता येईल असा ठेवतो. मुलांचं एक वैशिष्ट्य आहे की जी वस्तू जवळ असते ती ते चटकन उचलतात,त्यामुळे मुले मोबाईल उचलतात, अनेकजण व्हाट्सअप, फेसबुकच्या आहारी गेले आहेत, मोबाईलची सवय कमी करावी असा सल्ला त्यांनी दिला. नको त्या गोष्टीकडे जाणाऱ्या समाजाला योग्य मार्ग दाखवणारे तसेच रंजल्या गांजल्याची सेवा करणारेचं खरे संत आहेत.जोडोनिया धन उत्तम व्यवहारे,असाध्य ते साध्य करीता सायास, अहिंसावादी तुकाराम अशा विविध अंभगातून डॉ. जाधव यांनी संत तुकारामांचे विचार सर्वांना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुधाकर गिरे, यांनी केले. सुत्रसंचलन औदुंबर देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन धनंजय गुळवणे यांनी केले.यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष संदीपान जाधव, प्रा.डॉ.राजेंद्र धाये, मुख्याध्यापक अरुण ठेंग, जनार्धन मुळे,श्री शिंदे आदींच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमास मराठा सेवा संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह शिवप्रेमी पुरुष,महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नियोजन समितीच्या बैठकीत ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी



जालना । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या सन २०२६-२७ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखडयास आज जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी दिली.

जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. जालना जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. आजच्या बैठकीला यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री राजेश राठोड, अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जालना जिल्ह्याच्या २०२६-२७ च्या ७७८ कोटी ९७ लाखाच्या मर्यादेतील आराखड्यात भरीव वाढ करण्याची शिफारस राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार आहे. यावेळी सन २०२५-२६ च्या मंजूर आराखड्यातील १०० टक्के निधी खर्च करण्याचे निर्देश त्यांनी आज येथे दिले. बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकुणी यांनी केले. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व यंत्रणांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम; विभागीय आयुक्त कार्यालय राज्यात दुसरे

जालना । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात ई-गव्हर्नन्स उपक्रमांची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर तसेच नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आल्याने विभागाला हे यश मिळाले आहे.प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या या मूल्यमापनात कार्यालयाची वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तसेच तंत्रज्ञानाचा शासकीय



कामकाजात झालेला वापर या सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली. राज्यात दुसरा क्रमांक मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व विभागप्रमुखांशी संवाद साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, अपर विभागीय आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सहआयुक्त राजेश काटकर, उप आयुक्त दादासाहेब वानखेडे, उपआयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त सरीता सुत्रावे, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी विद्याधर शेळके, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## दादा आपल्यातून निघून गेल्याने जिवनातील सर्वात मोठ दुःख-अरविंद चव्हाण

जालना । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री व माझ्या राजकीय जीवनातील आधारवड असलेले अजितदादा जाण्याने जिवनातील सर्वात मोठ दुःख झालं अशी प्रतिक्रीया जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी दिली. दादांच्या नेतृत्वाखाली आपण तीन दशके राजकीय प्रवास केला. अजितदादा यांचे व माझे अतिशय घनिष्ठ व जिव्हाळयाचे संबंध होते. स्पष्टवक्तेपणा, शिस्तबंधता, वेळेचे काटेकोर पालन, स्वच्छतेविषयी अतिशय जागृतता, संघटन कौशल्य व धाडसीपणा अशा नेतृत्वास आज महाराष्ट्र मुकला. ही महाराष्ट्राची फार मोठी हानी आहे. राजकारणात जेष्ठ कार्यकर्त्यांबरोबर तरूणांचे ही मोठे चाहते असणारे दादा. जातीपातीचे राजकारण न करता सर्व समाजाला न्याय देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असायचा. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला



आमदार होण्याची संधी फक्त दादांमुळेच मिळाली. त्यांच्यासोबत काम करतांनाच्या अनेक आठवणी सांगण्यासारख्या आहेत परंतू यावेळी मी त्या व्यक्त करू शकत नाही. दादांच्या जाण्याने आमचा राष्ट्रवादी परिवार पोरका झाला आहे. अशा धुरंधर नेत्यास आपण आज मुकलो हे माझ्या जिवनात कधीही भरून न निघणारे दुःख आहे.

## पाच दिवसांचा आठवडा न केल्यास बँकिंग ठप्प करू

धाराशिव। प्रतिनिधी

नमागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली पाच दिवसांचा आठवडा ही बँक कर्मचाऱ्यांची जिव्हाळ्याची मागणी केंद्र सरकारने तत्काळ मान्य करावी, या मागणीसाठी आज बँक कर्मचाऱ्यांनी एकदिवसीय देशव्यापी संप पुकारला. याचे परिणाम शहरासह जिल्ह्यातही पहायला मिळाले. दरम्यान, ही मागणी मान्य न झाल्यास भविष्यात बँकींग सेवा ठप्प करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला.

स्टेट बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियनचे नेते गोरखनाथ लवटे यांनी सांगितले की, मागील काही वर्षांत बँकांमधील कामाचा बोजा प्रचंड वाढलेला आहे. आठ तासांच्या कामकाजाची मर्यादा असतानाही कर्मचाऱ्यांना दहा ते बारा तास काम करावे लागत असून सुट्टीच्या



दिवशीही बँकेत येऊन प्रलंबित कामे करावी लागत आहेत. बँकांचा व्यवसाय वाढत असताना कर्मचारी संख्या मात्र घटत असल्याने कर्मचाऱ्यांवर तणाव वाढत आहे. बाराव्या द्विपक्षीय करारा वेळी सहा महिन्यांत पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र दोन वर्षे उलटून बँक कर्मचाऱ्यांचा केंद्र सरकारला इशारा गेल्यानंतरही आयबीए व केंद्र सरकारकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. विविध संशोधन अहवालांमधून बँक कर्मचारी तणावग्रस्त अवस्थेत काम करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. कामकाज व जीवन संतुलन तसेच मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी पाच दिवसांचा आठवडा अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने वेळीच मागणी मान्य न केल्यास दोन दिवसीय अथवा बेमुदत संप करून संपूर्ण बँकिंग व्यवस्था ठप्प करण्याचा इशारा युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने दिला आहे. यावेळी एसबीआय स्टाफ युनियनचे पदाधिकारी अंकुश चव्हाण, श्रीचंद निलंगेकर, एसबीआय ऑफिसर्स असोसिएशनचे पदाधिकारी पद्माकर चांदणे, अविनाश कडू, एआयबीइए संघटनेचे शाहनवाज मुलानी, प्रमोद सुरवसे यासह धाराशिव शहर व परिसरातील १०० पेक्षा अधिक कर्मचारी व विविध बँकांमधील संघटनेचे सभासद उपस्थित होते.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

पटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.)संचलित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालय स्थानिक विकास समितीचे सदस्य ह. भ. प.रंधवे बापू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख सर, उपप्राचार्य, डॉ. सतीश माऊलगे,उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड कार्यालयीन अधिक्षक श्री. अशोक पवार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत संपल्यानंतर 'सुजान- सजग नागरिकत्वाची ' शपथ सामूहिक रितीने देण्यात आली, त्याचबरोबर वेगवेगळ्या विभागांच्या भितीपत्रकांचे प्रकाशन महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी छोटासा सांस्कृतिक देशभक्ती विषयक कार्यक्रम सादर करून या कार्यक्रमामध्ये रंगत आणली. प्रा. बलराम अविळे, प्रा. प्रदीप मांजरे इत्यादी प्राध्यापकांनीही देशभक्तीपर गीताचे गायन करून राष्ट्राभिमान व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, व प्रा. कावेरी खुरणे यांनी केले. सांस्कृतिक विभागाच्या आणि शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने प्रा.डॉ. देवानंद पुरी, प्रा. डॉ. विनोद पवार, प्रा. तानाजी आगळे, प्रा. डॉ. जगदीश कावरे प्रा. प्रदीप मांजरे, प्रा. नामदेव कळसकर इत्यादींनी कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## एमआयएमची गुर्मी उतरवू; पालकमंत्री शिरसाटांचा इशारा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

मुंब्रा आणि महाराष्ट्रासंदर्भात एमआयएम नेत्यांनी केलेल्या चिथावणीखोर वक्तव्याचा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. हा देश कोणत्याही एका जाती-धर्माचा नाही. अशा प्रकारची भडकाऊ विधाने करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, जो देशाच्या संस्कृतीला घातक आहे, अशा शब्दांत त्यांनी एमआयएमला ठणकावले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभानंतर शिरसाट प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मुंब्रा येथील एमआयएम नगरसेविकेने हिरवा मुंब्रा करण्याच्या दिलेल्या घोषणेवरून राज्यातील राजकारण तापले आहे. यावर भाष्य करताना शिरसाट म्हणाले की, संबंधित नगरसेविकेच्या वक्तव्याचा सर्वच स्तरांतून निषेध होत आहे. खुद्द मुस्लिम समाजालाही ही विधाने रुच लेली नाहीत. हा देश कुण्या एका जाती धर्माचा नाही, या देशाची संस्कृती जपण्याचे काम प्रत्येक भारतीय करतो. कोणी अतिशयोक्ती करत असेल तर त्याला योग्य वेळी जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा देत शिरसाट पुढे म्हणाले, काही लोकांमध्ये सत्तेची आणि पदाची मस्ती आली आहे. पाच-पन्नास नगरसेवक निवडून आले म्हणजे तुम्ही राज्यावर आक्रमण करणार का? तुमची ही गुर्मी आम्ही निश्चित उतरवू. एकदा जर आम्ही रस्त्यावर आलो, तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल. संबंधित नगरसेविकेने माफीनामा दिला होता, मात्र तिला पुन्हा उचकवून वक्तव्यावर ठाम राहण्यासाठी



दबाव आणला जात असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. यावेळी त्यांनी माजी खासदार इम्तियाज जलील यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीकास्त्र सोडले. दबावाचे हे राजकारण आम्ही सहन करणार नाही. संघर्षाची वेळ आली तर आम्ही मागे हटणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजकीय मैदानात एकमेकांचे कट्टर विरोधक असले तरी पालकमंत्री संजय शिरसाट आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्यातील स्नेहबंध प्रजासत्ताक दिनानिमित्त पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत.

जिल्ह्याच्या राजकारणात शिरसाट आणि अंबादास दानवे यांच्यातील वाकयुद्ध सर्वश्रुत असताना, खैरे यांच्याबाबत मात्र शिरसाट नेहमीच मवाळ भूमिका घेताना दिसतात. २६ जानेवारी रोजी पोलिस आयुक्तालयाच्या मैदानावर संचलनादरम्यान पालकमंत्री शिरसाट हे सलामी स्वीकारत असताना त्यांनी उपस्थितांना अभिवादन केले. यावेळी चंद्रकांत खैरे यांनी त्यांना हात जोडले असता, शिरसाटांनीही बरा चाललंय ना? अशी इशाऱ्यानेच विचारपूस केली.

## मंदिरासह दुकान,वाईन शॉप फोडून लाखोंचा ऐवज लंपास

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, वेगवेगळ्या भागांत घरफोडी आणि चोऱ्यांचे सत्र सुरूच आहे. गेल्या तीन दिवसांत चोरट्यांनी चेलीपुरा येथील डेली नीड्स, कामगार चौकातील वाईन शॉप आणि मुकुंदनगरातील एका मंदिराला लक्ष्य केले. या तिन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी ७ लाख ९ हजार रुपयांची रोकड लंपास केली असून, यामुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मुकुंदनगरात मंदिरातील दानपेटी चोरीला मुकुंदनगर भागातील महादेव मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून दानपेटी चोरीला गेल्याचे समोर आले आहे. ही घटना रविवारी (दि. २५) सकाळी साडेपाचच्या सुमारास रेल्वे गेट क्र. ५६ भागात उघडकीस आली. फिर्यादी कैलास बापूराव मेंडके (५०, रा. मुकुंदनगर) यांच्यासह स्थानिकांनी वर्षभरापूर्वी महादेव मंदिराची स्थापना केली होती. दानपेटीमध्ये अंदाजे पाच ते सहा हजार रुपये होते, असे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाईन शॉप फोडून ६ लाखांची रोकड लंपास वाईन शॉप फोडून चोरट्याने तब्बल ६ लाखांची रोकड लंपास केली. ही घटना शुक्रवारी (दि. २३) मध्यरात्री कामगार चौक, सिडको एन-२ भागात घडली. अशोक शिवनारायण जैस्वाल यांचे कामगार चौकात वाईन शॉप आहे. शॉपवर फिर्यादी वाल्मीक किसनराव नागरे (४६, रा. विश्रांतीनगर) हे मॅनेजर म्हणून काम करतात. नेहमीप्रमाणे २३ जानेवारीला रात्री ते दुकान बंद करून घरी गेले. मध्यरात्री चोरट्याने चॅनल गेट आणि शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. गल्ल्यातील व तिजोरीतील ५ लाख ९३ हजार आणि १५ हजार चिल्लर अशी रोकड लंपास केली. याप्रकरणी रविवारी (दि. २५) मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अजितदादांच्या अपघाती मृत्यूनंतर बीड जिल्हा कडकडीत बंद

## जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसाने केली हळहळ व्यक्त; राष्ट्रवादीचे नेतेही ढसाढसा रडले

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या मृत्यूची बातमी समजताच बीड शहरासह जिल्ह्यातील सर्वच तालुक्याच्या ठिकाणी आणि ग्रामीण भागातही नागरिकांनी बंद पाळून श्रद्धांजली वाहिली. यावेळी प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्यातील नेते ढसाढसा रडले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.प्रकाश सोळंके, माजी आ.साठे, आ.सुरेश धस, माजी आ.भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, नगरसेवक अमर नाईकवाडे आदींनी अत्यंत जड शब्दामध्ये आपल्या प्रतिक्रिया दिल्या. दरम्यान शरद पवार गटाचे आ.संदीप क्षीरसागर हे या घटनेची माहिती मिळताच बारामती येथे पोहोचले. यावेळी सर्वसामान्य नागरिकांनीही अजित दादांच्या निधनामुळे हळहळ व्यक्त केली. जिल्हाभरामध्ये व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंद पाळून अजितदादांना श्रद्धांजली वाहिली.



### माजलगाव मधील व्यापारपेठ कडकडीत बंद; सर्वपक्षीयांच्या वतीने अजितदादांना श्रद्धांजली

माजलगाव । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे दि २८ जानेवारी बुधवार रोजी सकाळी सुमारे नऊच्या सुमारास विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची धक्कादायक बातमी समजताच संपूर्ण राज्यात शोककळा पसरली. या घटनेचे तीव्र पडसाद माजलगाव शहरातही उमटले. या दुःखद घटनेच्या निषेधार्थ आणि शोक व्यक्त करण्यासाठी



माजलगाव शहर शंभर टक्के बंद ठेवण्यात आले.

शहरातील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी एकत्र येत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन केले. यावेळी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. त्यांच्या निधनाने राज्याने एक अनुभवी, कर्तव्यदक्ष आणि जनतेसाठी सातत्याने कार्य करणारा नेता गमावल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. श्रद्धांजली सभेनंतर उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त करत अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक कार्याचा गौरव केला.त्यांच्या अचानक जाण्याने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठी पोकळी निर्माण झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहरातील सर्व दुकाने, बाजारपेठा आणि व्यावसायिक आस्थापने दिवसभर कडकडीत बंद ठेवण्यात आली होती.नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने या बंदमध्ये सहभाग घेत दुःख व्यक्त केले.

### अजितदादा पवारांच्या निधनानंतर धारूर कडकडीत स्वयंस्फूर्तीने बंद; सर्वत्र शोककळा

**किल्ले धारूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाचा अपघात होऊन अकस्मित निधनाचे वृत्त धारूर शहरात समजतात शहरातील व्यापार पेठ स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद करण्यात आली शहरातील व तालुक्यातील नागरिकातही शोककळा पसरली होती व आकस्मित निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त केले जात होते धारूर शहरात नगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने झालेली त्यांच्या सभेची आठवण प्रत्येकाला होत होती.

राज्याची उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त धारूर शहरात समजतात सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात आले त्यांच्या



नगरपालिका निवडणुकीतील सभेची व भाषणाची आठवण प्रत्येकास होत होती राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात नगरपरिषद दिल्याने विकासाची आशा जनतेस त्यांनी दिलेल्या भाषणातील प्रत्येक शब्दावर नागरिकांना आठवण करून देत होती त्यांच्या जाण्याचे वृत्त समजताच व्यापार पेठ कडे कोट बंद स्वयंस्फूर्तीने करण्यात आली व कार्यकर्त्यांतही त्यांच्या जाण्याने दुःख व्यक्त केले जात होते व शहरावर शोककळा पसरली होती.

### अजितदादांच्या जाण्याने मनाला चटका –मंत्री पंकजा मुंडे



दादा अशी एक्झिट घ्यायची नव्हती!! ... तुम्ही जीवाला चटका लावून गेलात... तुम्ही सदैव स्मरणात रहाल.. तुमच्याबरोबर प्रवास केला, चर्चा केल्या, अगदी गप्पाही खूप मारल्या.. तुमचा राजकीय आणि ॲकडमिक सेन्स खूप जबरदस्त होता. तुमच्या भाषणातून, विनोद बुद्धीने तुम्ही अनेकांना स्पष्ट बोलूनही हसवलं.. पण आज तुमच्या जाण्याने तुम्ही कार्यकर्त्यांना रडवलं..असा अनुभवी नेता होणे नाही .. महाराष्ट्र एका डायनॉमिक नेत्याला मुकला.. गोपीनाथ मुंडे परिवारातर्फे आदरांजली, अशा शब्दांत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी श्रद्धांजली वाहिली.

### अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी समजताच आठवडी बाजार असतानाही चौसाळा शहर कडकडीत बंद



चौसाळा : उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाची धक्कादायक बातमी समजताच चौसाळा शहरात शोककळा पसरली. ही बातमी कळताच चौसाळा येथील आठवडी बाजार सुरू असतानाही व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवून संपूर्ण चौसाळा शहर कडकडीत बंद पाळला. नेहमी गजबजलेला आठवडी बाजार आज पूर्णपणे शांत दिसून आला. नागरिकांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत दादांना श्रद्धांजली वाहिली.

दरम्यान, चौसाळा येथील बस स्थानक परिसरात सर्वपक्षीय कार्यकर्ते, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि चौसाळा शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन याठिकाणी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळून दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी अमर रहे, अमर रहे, अजित दादा अमर है अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. दादांच्या निधनाने चौसाळा परिसर तसेच स्थानिक जनतेमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

### आष्टी मतदारसंघाच्या विकासात अजितदादांचा मोठा वाटा –माजी आ.बाळासाहेब आजबे

आष्टी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यावर नियतीने घाला घालत महाराष्ट्राचे नव्हे तर बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे त्यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्रातील प्रत्येक



माणसावर शोककळा पसरली असून महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे . आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या विकास कामात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

◀◀ पान ३ वर

### महाराष्ट्रासह बीड झाला पोरका –ॲड.शफीक

आजची सकाळ अकल्पनीय होती. पहाटे उठुन कामाला लागणारे महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व तब्बल ७ वेळा उपमुख्यमंत्री रहिलेले अजित पवार यांचा अपघाती मृत्यू होणे हे मनाला पटत नाही. विश्वास बसत नाही अतिशय कठोर मनाने हे सत्य स्विकारायला अंतकरण जड होत आहे. अजित पवारांसारखा मोठा नेत्याचा असा अंत होणे मनाला प्रचंड वेदना देत आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा



◀◀ पान ३ वर

### पारदर्शक आणि प्रामाणिक नेतृत्व हरपले –आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून, या घटनेवर आमदार सुरेश धस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.



आपल्या शोकसंदेशात आ. धस म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या जाण्याने मन हेलावून गेले आहे. शोक व्यक्त करताना शब्द अपुरे पडत आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीने आजची सकाळ अत्यंत दुर्दैवी ठरली आहे.ते पुढे म्हणाले, स्वभावाने अजितदादा जरी थोडे फटकळ वाटत असले, तरी मनाने ते अत्यंत निर्मळ, पारदर्शक आणि प्रामाणिक होते. त्यांच्या बोलण्यात कधी कधी कठोरपणा जाणवत असे, मात्र ज्या व्यक्तीशी ते फटकळपणे बोलत, त्याच व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याचे काम करून देणे, हा त्यांचा खरा स्वभाव होता. आपला व्यक्तिगत संबंध अधोरेखित करताना आ. धस म्हणाले, मी दादांच्या अत्यंत जवळ होतो. त्यांना अतिशय जवळून पाहिले आणि समजून घेतले. त्यामुळेच त्यांचा हा अचानक आणि दुर्दैवी अपघात स्वप्नातही न पाहिलेला, मोठा धक्का देणारा आहे. काम, नेतृत्व आणि माणुसकीच्या प्रत्येक क्षेत्रात 'दादा' म्हणून ओळखला जाणारा नेता आज अचानक आपल्यातून निघून गेला, ही बाब अत्यंत वेदनादायक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. शेवटी आ. सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, त्यांच्या आठवणी आणि त्यांनी जपलेली मूल्ये सदैव प्रेरणा देत राहतील, असे नमूद केले.

### धाडशी नेता हरपला –माजी आमदार भीमराव धोंडे



आष्टी : महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरील एक धडाडीचे,कार्यतत्पर आणि प्रशासनावर जबरदस्त पकड असणारा नेता आज काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या निधनाने संपूर्ण राज्याची मोठी हानी झाली आहे.या लोकनेत्याच्या जाण्याने सर्वसामान्य जनतेतून आणि राजकीय वर्तुळातून मोठी शोककळा पसरली आहे. जनतेतील एक हजरजवाबी आणि धाडसी नेता हरपला प्रशासनावरील जरब अन् कार्यतत्पर व धाडशी नेता हरपला; लोकनेत्याच्या निधनाने महाराष्ट्र शोकाकुल अशा शब्दांत माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपली भावूक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

## लाच घेताना खासगी इसमासह पोलीस कर्मचाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ पकडले

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस कर्मचारी आणि एक खाजगी इसम यांना दि २८ जानेवारी बुधवार रोजी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने २० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले.या कारवाईमुळे माजलगाव शहरात एकच खळबळ उडाली आहे.

वाळूचे टेंडर होऊन अवघे चार दिवस होत नाहीत,तोच वाळू वाहतुकीसाठी हप्त्यांची मागणी सुरू झाल्याचे समोर आले आहे. वाळूची वाहने सुरळीत चालू ठेवायची असतील तर दरमहा २० हजार रुपयांचा हप्ता द्यावा लागेल, अशी मागणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी अमोल कदम याने एका तक्रारदाराकडे केली होती.ही लाच खाजगी इसम तात्यासाहेब आर्डे याच्या माध्यमातून स्वीकारली जाणार होती.या तक्रारीच्या आधारे जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक बाळासाहेब जाधव व त्यांच्या पथकाने सापळा रचून दि २८ जानेवारी बुधवार रोजी माजलगाव बायपास रोडवरील लेंडाळ हॉस्पिटलसमोर दोघांनाही लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. दोन्ही आरोपींना पुढील चौकशीसाठी बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात आणण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या कारवाईमुळे पोलीस प्रशासनातील लाचखोरी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.सदर लाच वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी मागितली होती का? यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का? तसेच वरिष्ठांवर काय कारवाई होणार,याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ऑनलाइन सट्टा खेळणाऱ्या सात जणांना पकडले

बीड । प्रतिनिधी

बीड बायपास येथील शेतामध्ये ऑनलाईन सट्ट खेळणा-या सात जणांना पकडून त्यांच्याकडून जवळपास पाच लाखाचा माल जप्त करण्यात आला ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, धुळे सोलापुर जाणारे हायवे रोडलगत घाटेच्या शेतामधील घरासमोरी उघड्या पत्र्याच्या शेडमध्ये आँनलाईन जुगार सट्टा खेळत आहेत.पोलीस अधीक्षक सो बीड नवनीत काँवत सो, अप्पर पोलीस

### गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई



अधीक्षक बीड सचिन पांडकर सो, व पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोह/८३७ गोविंद राख, १६२६ राहुल शिंदे, पोअ/२२१५ परजणे, पोह/२२१० अशफाक व चापोह /७७९ वडमारे असेनी मिळुन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन दि.२७.०१.२०२६ रोजी २१.०० वाजता छापा मारला असता. सदर ठिकाणी इसम नामे १) वैभव आण्णासाहेब आमटे वय २१ वर्षे रा. खांडे पारगाव ता. जि.बीड व २) अभिषेक भारत आमटे वय २३ वर्षे रा. खांडे पारगाव ता.जि.बीड यांच्यासह इतर सात (७) इसमांनी

◀◀ पान ३ वर

### नानीबाई चौरे यांचे दुःखद निधन

बीड । प्रतिनिधी

खंडाळा येथील रहिवासी नानीबाई आबाजी चौरे यांचे मुंबई येथील कपूर रुग्णालयात उपचार



सुरू असताना बुधवारी सकाळी दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्ष होते.

आज गुरुवारी सकाळी ८:३० वाजता खंडाळा येथे अंत्यसंस्कार होतील स्व नानीबाई यांच्या पश्चात हौसारव ,अजिनाथ, अशोक अशी तीन मुले सुना एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.

## सिंदफना नदीपात्रात अवैध वाळूचा टेम्पो पकडला,पिंपळनेर पोलिसांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध वाळू उपसा व वाहतुकी विरोधात पिंपळनेर पोलीसांनी प्रभावी कारवाई करून आयशर कंपनीचा टेम्पो व वाळू असा एकूण अंदाजे रु. २०,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. दिनांक २८/०१/२०२६ रोजी रात्री ०१.१० वाजण्याच्या सुमारास, सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती




मिळाली की, नाथापुर शिवारातील सिंदफना नदी पात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा करून तिची चोरटी वाहतूक व विक्री केली जात आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचासह नाथापुर गावाजवळील सिंदफना नदी पुलाजवळ सापळा रचला.

दरम्यान, संशयास्पद पिवळ्या रंगाचा आयशर कंपनीचा टेम्पो (२३ ५१९०) थांबवून तपासणी केली असता, टेम्पोमध्ये अंदाजे दोन ब्रास वाळू आढळून आली. टेम्पो चालकाने आपले नाव आकाश मधुकर लांडगे (वय ३४ वर्षे, रा. गुंदा, ता. जि. बीड) असे सांगितले. वाळू वाहतुकीबाबत परवाना अथवा रॉयल्टी बाबत विचारणा केली असता, कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाईत आयशर कंपनीचा २०९५ मॉडेलचा टेम्पो (अंदाजे किंमत

◀◀ पान ३ वर

## फुलेपिंपळगाव येथे सार्वजनिक भारतीय संविधान वाचनाचा सांगता समारंभ

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील फुलेपिंपळगाव येथे २६ नोव्हेंबर २०२५ संविधान दिना पासून ते २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिना पर्यंत सलग २ महिने सार्वजनिक भारतीय संविधानाचे सार्वजनिक वाचन करण्यात आले त्या कार्यक्रमाचा सांगता/समारोप २७ जानेवारी रोजी आयोजीत करण्यात आला होत या कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांचे



मान्यवरांच्या हस्ते पुष्प हार अर्पन करुण जिजाऊ वंदना व संविधान प्रस्ताविकेचे वाचन करुण करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष माजलगावचे तहसीलदार –संतोष रुईकर साहेब हे होते तर प्रमुख पाहुने म्हणुन,ईग्लवुड इंग्लिश स्कूल फुलेपिंपळगावचे मुख्याध्याप मा. सत्यजित कांजळकार सर ,सिंदफना पब्लिक स्कूल चे मुख्याध्यापक मा.अन्वार शेख सर,जि प प्रा शाळा फुलेपिंळगावचे मुख्याध्यापक, मा. गौतम घनघाव सर, वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंदभाऊ साळवे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते मा अॅड नारायण गोले पाटील,शेतकरी नेते.तालुकाध्यक्ष, मा.सुधीर गजमल सर,कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव मा. हरिभाऊ नाना सवणे ,तहसील कार्यालय टपालवाहक,मा.गजमल मॅडम , संविधान पंधरवाडा, संविधान सप्ताह,वाचना चे आयोजक क्रष्टाईब ते तालुका अध्यक्ष

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दादा...तुम्ही आम्हाला का सोडून गेला; बारामतीकरांचा हंबरडा

बारामती । प्रतिनिधी

**बारामती मेडिकल कॉलेज परिसरात 'अजितदादा परत या' या हाकेतून व्यक्त होणारा आवाज, अश्रूंचा बांध फुटलेली जनता आणि स्तब्ध झालेल्या वातावरणाचे दृश्य अंतःकरण पिळवटून टाकणारे होते. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर अनेकांच्या चेहऱ्यावर विश्वास न बसणारी शांतता दिसत होती. बारामती विमानतळावर उतरत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात आला आणि विमान जमिनीवर कोसळले. या भीषण अपघातात अजित पवार आणि विमानातील इतर चार लोक यांचा अंत झाला. ही मन सुन्न करणारी धक्कादायक बातमी कळताच बारामतीकरांसह राज्यातील नेतेमंडींसह जनसामान्यांनी मेडिकल कॉलेज परिसरात प्रचंड गर्दी केली होती. आपल्या लाडक्या नेत्याचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी लोकांनी मिळेल त्या वाहनाने, काहींनी पायीच, तर काहींनी अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी प्रवास करत बारामती गाठली.**



बारामतीसह पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर आणि राज्याच्या विविध भागांतून हजारो नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकारी मेडिकल कॉलेजकडे धाव घेतल्याचे दिसून आले.सकाळपासूनच मेडिकल कॉलेज परिसरात शोकाकुल वातावरण पसरले होते.

'दादा' या हाकेतून व्यक्त होणारी वेदना, अश्रूंचा बांध फुटलेली जनता आणि स्तब्ध झालेले वातावरण, हे दृश्य अंतःकरण पिळवटून टाकणारे होते. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर अनेकांच्या चेहऱ्यावर विश्वास न बसणारी शांतता दिसत होती. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाचा बारामतीत अपघात झाला आणि दादा आपल्यात नाहीत. त्यांचा मृतदेह बारामती मेडिकल कॉलेजमध्ये आणला आहे. त्याचवेळी कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, युगेंद्र पवार, आमदार रोहित पवार, राजेंद्र पवार, सचिन सातव, संभाजी होळकर आदी नेतेमंडळी येथे पोचले. सकाळी ९ ची ही बातमी वाऱ्यासारखी बारामती पसरली. लोक पुर्णतः गोंधळून गेले. घाबरेलेल्या स्थितीत मिळेल त्या वाहनांनी बारामतीतीमधील लोकांनी येथील मेडिकल कॉलेजकडे धाव घेतली. सुरवातीचे मर्यादित गर्दीचे रुपांतर मात्र ११ वाजता अक्षरशः जनसागर झाले. बारामतीकरांसह राज्यातील नेते मंडळी, अधिकारी, कार्यकर्तांचा प्रचंड ओघ वाढत गेला. ज्येष्ठ नेते शरद पवार, जय पवार, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, श्रीनिवास पवार, पार्थ पवार, उदयनराजे भोसले, सुनिल तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार उत्तमराव जानकर, रुपली चाकरणकर, शशिकांत शिंदे, माजी खासदार रणजित निंबाळकर आदी नेतेंमंडळींचा समावेश होता. दादा..तुम्ही का आम्हाला सोडून गेला, असा सवाल करीत अनेकांनी अक्षरशः मेडिकल कॉलेजच्या दारातच हांबरडा फोडला. वाढत्या गर्दीमुळे पोलीस प्रशासनासह आरोग्य विभागाची चांगलीच धावपळ उडाली. मेडिकल कॉलेजकडे येणारे सर्व मार्ग क्षणातच गर्दीने भरून गेले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने पर्यायी मार्ग खुले केले. वरिष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी, तसेच स्वयंसेवकांनी नागरिकांची गर्दी नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. याचवेळी आरोग्य विभागाकडून आपत्कालीन सेवा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली होती. रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र मार्ग, वैद्यकीय पथकांची तैनाती तसेच गर्दीमुळे कोणालाही त्रास होऊ नये, यासाठी सतत सूचना केल्या जात होत्या. भावनिक तणावामुळे सुरेश शितोळे (सातारा) यांच्यासह काही नागरिकांना चक्कर येण्याचे प्रकार घडले, मात्र तत्काळ उपचार देऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली.

अजितदादा पवार यांच्याशी भावनिक नाते असलेल्या बारामतीकरांसाठी हा क्षण अत्यंत वेदनादायी ठरला. विकासाचे स्वप्न, ठाम नेतृत्व आणि जनतेशी असलेली थेट नाळ यामुळे 'दादा' म्हणून ओळखले जाणारे हे नेतृत्व हरपल्याची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटत होती. 'आमचा कामाचा माणूस गेला, आमचा आधार गेला,' अशा शब्दांत अनेकांनी आपली भावनांना व अश्रूंना वाट मोकळी करून दिली. मेडिकल कॉलेज परिसरात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी प्रशासन सातत्याने आवाहन करत होते. अशा शोकमय वातावरणातही शिस्त, संयम आणि एकमेकांविषयीची काळजी दिसून येत होती, हे या जनसागराचे वैशिष्ट्य ठरले.

## नियतीचा योगायोग! ज्या घड्याळानं सत्ता मोजली, राजकारणात नाव दिलं; त्याच घड्याळानं अजितदादांची शेवटची ओळख पटवली

बारामती । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे बुधवारी (२८ जानेवारी) बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. विमानात असलेल्या इतर पाच जणांचाही मृत्यू झाला. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा भाग म्हणून अजित पवार बारामती तालुक्यात विविध सभांना संबोधित करणार होते.

बारामतीमध्ये अजित पवारांचा कार्यक्रम सकाळी १० वाजता निरवागज येथे सुरू होणार होता. त्यानंतर दुपारी १२ वाजता पांढरे येथे रॅली होणार होती. दुपारी ३ वाजता करंजेपुल येथे जाहीर सभेला संबोधित केल्यानंतर, त्यांची अंतिम रॅली सायंकाळी ५:३० वाजता सुपा येथे होणार होती. बारामतीमध्ये लँडिंग दरम्यान व्हीएसआर ऑपरेटरचे एक लियरजेट-४५ विमान कोसळले. यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात ठामपणे आपली छाप उमटवणारे अजित पवार होते. ते निर्णयांची धार, प्रशासनावरची पकड आणि वेगळी कार्यशैली यासाठी ओळखले जाणारे नेते होते. पण नियतीने इतका क्रूर खेळ खेळावा, की अखेरच्या क्षणी त्यांची ओळख पटावी ती



घड्याळावरून.. हे कुणाच्याही मनाला चटका लावणारं आहे. कारण घड्याळ हे राष्ट्रवादी पक्षाचं चिन्ह आहे. अपघातानंतर घटनास्थळी परिस्थिती अत्यंत विदारक होती.

जखमा इतक्या गंभीर होत्या की प्रथमदर्शनी ओळख पटणं कठीण झालं. आसपास कुठलाही ओळखीचा कागद, मोबाईल किंवा कागदपत्रे उपलब्ध नव्हती. मात्र त्यांच्या मनगटावर असलेलं घड्याळ तेच घड्याळ ज्याने वर्षानुवर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं चिन्ह म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळं स्थान निर्माण केलं होतं. ते घड्याळ केवळ वेळ दाखवणारी वस्तू नव्हती. तर ते होते संघर्षाचं प्रतीक, सत्तेच्या राजकारणात टिकून राहण्याचं चिन्ह आणि लाखो कार्यकर्त्यांच्या ओळखीचा अभिमान. त्याच घड्याळामुळे अजित पवारांची ओळख पटली. जणू राजकारणाशी असलेलं त्यांचं नातं शेवटच्या श्वासापर्यंत तुटलंच नाही. कार्यकर्त्यांसाठी हा क्षण शब्दात मांडणं कठीण आहे. ज्यांच्या एका इशाऱ्यावर निर्णय बदलायचे, ज्यांच्या भाषणातून आत्मविश्वास ओसंडून वाहायचा, ते अजितदादा आज केवळ आठवणींमध्ये उरले आहेत. पण त्या आठवणींच्या केंद्रस्थानी कायम राहील ते घड्याळ... जे त्यांच्या आयुष्याचं आणि राजकीय प्रवासाचं साक्षीदार ठरलं. आज महाराष्ट्र एका कणखर नेत्याला मुकला आहे. पण अजित पवारांच्या मनगटावरचं ते घड्याळ, राजकारणाच्या इतिहासात कायम टिक-टिक करत राहील. त्यांच्या आठवणी जिवंत ठेवत.

## आपले दादा गेले! भोर-राजगड तालुक्यात शोककळा; कडकडीत बंद पाळून भावपूर्ण श्रद्धांजली

नसरापूर : कामाचा माणूस आणि शब्दांचा पक्का म्हणून ओळखले जाणारे राज्याचे कणखर नेतृत्व करणारे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघात निधनाने संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत असतानाच भोर आणि राजगड तालुक्यात देखील सर्व समावेशक घटकातून 'आपले दादा गेले' अशी प्रतिक्रिया निशब्द भावना प्रत्येकांच्या चेहऱ्यावर उमटली आहे. दोन्ही तालुक्यात बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून दुखवटा पाळण्यात येत आहे.

धुरंदर नेते राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी दुर्दैवी विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त समजताच संपूर्ण भोर आणि राजगड तालुक्यात शोककळा पसरली आहे. नसरापूर ( ता. भोर ) येथील नसरापूर व्यापारी संघटनेच्या वतीने तातडीने बंदची हाक देताच अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण बाजारपेठा बंद करून कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. तर दोन्ही तालुक्यात हीच परस्थिती निर्माण झाली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पदाधिकारी कार्यकर्त्यांसह राजकीय विरोधक पक्षातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रत्येकांच्या डोळ्यातून अश्रू देखील तरळले असल्याचे चित्र दिसून येत आहे. अजितदादा पवार जलसंपदा राज्यमंत्री पासून सहा वेळा उपमुख्यमंत्री कार्यकाळ राहिला. या काळात पवार यांनी राज्यसह पुणे जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलला आहे. गृह खाते, कृषी, क्रीडा, शैक्षणिक, सहकार यासह अनेक विकासकामाच्या गातील देण्याचे काम केल्याचे अनेक आठवणींना उजाळा नागरिकांच्या शब्दरूपी प्रतिक्रिया मधून उमटत आहे.


## शब्दाला जागणारं नेतृत्व..! अजित दादांचा ३५ वर्षांचा राजकीय प्रवास

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे ज्येष्ठ नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक निधन झाले आहे. या धक्कादायक बातमीने संपूर्ण देशावर शोककळा पसरली असून राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

अजित पवार (१३५९-२०२६) हे महाराष्ट्रातील सर्वात प्रभावशाली राजकारण्यांपैकी एक होते, त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा काम पाहिले. तसेच त्यांनी वित्त आणि नियोजन यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली.

ते त्यांच्या मजबूत संघटनात्मक कौशल्यांसाठी, निर्णायक नेतृत्वासाठी आणि राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (छउझ) आकार देण्यात बजावलेल्या भूमिकेसाठी ओळखले जात होते. दुर्दैवाने २८ जानेवारी २०२६ ला बारामती येथे झालेल्या विमान अपघातात त्यांच्या कारकिर्दीचा अकाली अंत झाला.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कणखर आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून अजित आशाताई अनंतराव पवार यांची ओळख आहे. त्यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील देवळाली-प्रवरा या गावी झाला. मूळचे पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी येथील असलेल्या त्यांनी बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शेती हा मुख्य व्यवसाय असलेल्या पवार कुटुंबात समाजसेवेचे बाळकडू त्यांना मिळाले. पुढे त्यांनी सुनेत्रा पवार यांच्याशी विवाह केला. पार्थ आणि जय ही दोन मुले आहेत. त्यांच्या राजकीय प्रवासाची खऱ्या अर्थाने सुरुवात १९९१ मध्ये झाली. त्यांनी जून १९९१ ते सप्टेंबर १९९१ या अल्प कालावधीसाठी लोकसभा सदस्य म्हणून काम पाहिले. त्यानंतर त्यांनी राज्य राजकारणावर लक्ष केंद्रित केले आणि १९९१ पासून सलग



आजपर्यंत ते बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत होते. अजित पवारांनी सहा वेळेस उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती.

अजित पवार यांनी राज्य शासनात विविध महत्त्वाची पदं भूषवली राज्यमंत्री: १९९१ ते १९९३ या काळात त्यांनी कृषी, फलोत्पादन, ऊर्जा आणि नियोजन या खात्यांची जबाबदारी सांभाळली. कॅबिनेट मंत्री: १९९९ पासून त्यांनी जलसंपदा (पाटबंधारे), ग्रामविकास आणि पाणीपुरवठा यांसारखी महत्त्वाची खाती यशस्वीपणे हाताळली. उपमुख्यमंत्री: त्यांनी अनेकदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. २०१० पासून ते आजपर्यंत (५ डिसेंबर २०२४ पासून नवीन कार्यकाळ) त्यांनी या पदावर राहून राज्याच्या वित्त व नियोजन विभागाला गती दिली आहे. विरोधी पक्षनेते: जुलै २०२२ ते जून २०२३ या काळात त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही प्रभावी भूमिका बजावली.

**सहकार आणि क्रीडा क्षेत्रातील योगदान**

केवळ राजकारणच नव्हे, तर सहकार आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. सहकार क्षेत्र: त्यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (अध्यक्ष म्हणून अनेक वर्षे) आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक येथे नेतृत्व केले आहे. तसेच 'महानंद' आणि 'रयत शिक्षण संस्था' यांसारख्या संस्थांवरही त्यांनी काम केले आहे. क्रीडा: त्यांना क्रिकेट आणि टेनिसची आवड आहे. त्यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन आणि कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले. ३० जून २०२३ पासून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. समाजकार्य हा त्यांचा छंद असून, अभ्यासासाठी त्यांनी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि इस्रायल यांसारख्या अनेक देशांचे दौरे केले आहेत.

## ओतूर महामार्गावर भीषण अपघात; कार झाडाला धडकून पलटी, दोन युवकांचा मृत्यू

ओतूर: ओतूर (ता. हद्दीतील महामार्गावरील येथे नंदलाल एक कार झाडाला धडकून नंतर पलटी झाली. या भीषण अपघातात दोन तरुण जागीच ठार झाले असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात मंगळवारी (दि. पहाटे वाजण्याच्या सुमारास घडला. वरद अमोल तांबे (वय रा. ता. व लक्ष्मण पवळे (वय रा. ता. मुळशी) असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या युवकांची नावे असून, अभिनव गणेश वाकचौरे व ओंकार गोरक्ष शिंदे (रा. हे दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.



ओतूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे चौघे युवक सध्या सुरू असलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर व्हिडिओ बनवून प्रचार करण्याचे काम करीत होते. ते मित्राला त्याचे घरून आणण्यासाठी गेले होते. दिशेने येत असताना येथे नंदलाल असून चालकाला रस्त्यावर अचानक निदर्शनास आल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही कार थेट आदळून पलटी झाल्यामुळे हा अपघात घडला. यामध्ये वरद तांबे व पवळे यांचा मृत्यू झाला, तर अभिनव वाकचौरे व ओंकार शिंदे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताचा तपास ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांचे मार्गदर्शनात ओतूर पोलिस करीत आहेत.


युवक करणार आंदोलन

येथील महामार्गावर मोठ्या प्रमाणात पडले आहेत. येथे वारंवार अपघात घडत असताना देखील संबंधित रस्ते बांधकाम विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने नागरिक झाले आहेत. येथील तत्काळ येथील रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली असून, रस्ता दुरुस्त न झाल्यास तीव आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## मसाप निवडणुकीत पुण्यात रस्सीखेच

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीत पुणे वगळता अन्य सर्व जिल्हा प्रतिनिधींची निवडणूक बिनविरोध झाली आहे. यामुळे आता पुण्याच्या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



स्थानिक कार्यवाह पदाच्या दोन जागांवरील चारुदत्त निमकर आणि विनायक आंबेकर यांनी माघार घेतली आहे. आंबेकर यांनी याआधी कोषाध्यक्ष पदावरूनही माघार घेतली होती. त्यामुळे आता आंबेकर एकाही पदासाठी निवडणूक लढवत नाहीत. सातारा जिल्हा प्रतिनिधीपदासाठी अर्ज दाखल केलेले तुषार महामुलकर, धुळे जिल्हाप्रमुख म्हणून सुरेंद्र मोरे आणि सदाशिव सूर्यवंशी आणि नाशिक जिल्हाप्रमुखपदी अर्ज दाखल केलेले सुदाम सातभाई अशा एकूण सहा जणांनी माघार घेतली आहे. यामुळे पुणे वगळता अन्य सर्व शहरातील शाखांची निवडणूक बिनविरोध झाली आहे. आता अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष, स्थानिक कार्यवाह आणि पुणे जिल्हाप्रमुख या पदांसाठी थेट निवडणूक होणार आहे.

## गुरुवारी पुण्यातील सर्व दुकाने बंद राहणार, व्यापारी महासंघाची माहिती

पुणे : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री, लोकनेते अजित दादा पवार यांच्या आकस्मित व दुर्दैवी निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी व धक्कादायक आहे. अजित दादा पवार यांना श्रद्धांजली म्हणून गुरुवार दि. २९ जानेवारी रोजी पुणे शहरातील सर्व व्यापाऱ्यांची दुकाने संपूर्ण दिवसभर बंद राहतील असा निर्णय पुणे व्यापारी महासंघातर्फे घेण्यात आला आहे. याविषयीची माहिती पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फतेचंद रांका व सचिव महेंद्र पितळीया यांनी कळविली आहे.



जनतेच्या सेवेसाठी अविरत कार्य करणारा एक कर्तव्यदक्ष, परखड आणि प्रभावी नेता आज आपल्यातून निघून गेला, ही संपूर्ण महाराष्ट्रासह पुण्यातील व्यापारी बांधवांसाठी अपरिमित हानी असल्याचे सांगत रांका म्हणाले, अजितदादा पवार यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात राज्याच्या विकासासाठी, प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यासाठी उद्योग.

व्यवसाय व व्यापारी वर्गाच्या प्रश्नांकडे नेहमीच सकारात्मक दृष्टीने पाहून निर्णय घेतले. पुणे शहर व जिल्ह्याच्या विकासात पायाभूत सुविधा, अर्थकारण आणि व्यापारी हितसंबंध यासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून ते सदैव स्मरणात राहील.

या दुःखद प्रसंगी पुणे व्यापारी महासंघाच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांप्रती, आप्तस्वकीयाप्रती व असंख्य समर्थकांप्रति आम्ही मनःपूर्वक शोक संवेदना व्यक्त करतो. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व या कठीण काळात कुटुंबीयांना आणि अनुयायांना दुःख सहन करण्याचे बळ देवो अशी प्रार्थना पितळीया यांनी केली.